


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०३ ● अंक : ०६६ ● पुणे ● मंगळवार, दि. १८ नोव्हेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



‘खेळ रंगला पैठणीचा’ भव्य कार्यक्रम उत्साहात संपन्न 3



“निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून मला संधी मिळावी” 4

# वृत्तपत्रांनी एकत्र येत काम करण्याची गरज

## दै. आरंभ पर्वचे व्यवस्थापकीय संपादक तथा दै. गांवकरीचे पुणे निवासी संपादक प्रतिक गंगणे यांचे मत”

- **ज्येष्ठ गझलकार भीमराव पांचाळे यांचा दै. आरंभ पर्व तथा दै. गांवकरी समूहातर्फे सत्कार**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आजच्या माहितीच्या महास्फोटाच्या युगात वृत्तपत्रांनी एकत्र येत, परस्पर सहकार्याच्या भावनेने काम करण्याची गरज पूर्वीपेक्षा अधिक वाढली आहे. “ही त्या वृत्तपत्राची बातमी, मग आम्ही का लावू?” किंवा “त्या पेपरचे नाव उद्धृत करू नका” असे म्हणत अनेक वृत्तपत्रे एकमेकांपासून दुरावत चालली आहेत. ही मानसिकता दूर झाली नाही, तर पत्रकारितेची गुणवत्ता आणि विश्वासार्हता दोन्ही धोक्यात येऊ शकतात, असे स्पष्ट मत दै. ‘आरंभ पर्व’चे व्यवस्थापकीय संपादक आणि दै. गांवकरी चे निवासी संपादक प्रतिक गंगणे यांनी व्यक्त केले.

पुणे-पिंपरी चिंचवड येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने आयोजित भव्य पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. पत्रकारिता, साहित्य, सामाजिक कार्य आणि लोकसंपर्क या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

या सोहळ्यात विधानसभा उपसभापती नीलम ताई गोऱ्हे व विधान परिषदेचे उपसभापती अण्णा बनसोडे यांच्या हस्ते दैनिक समर्थ गांवकरी दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले यावेळी त्यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी दिवाळी अंक, घड्याळ आणि शाल देऊन बहुमानपूर्वक सत्कार केला. यावेळी दै. आरंभ पर्वच्या संपादिका सौ. सुरेखा मते, पत्रकार महेश वरवटे, प्रतिक गंगणे, दै. गांवकरीचे संस्थापक तथा संपादक मा. श्री. विश्वासराव आरोटे, मार्केटिंग हेड अभिषेक मरगळे उपस्थित होते.

यावेळी ज्येष्ठ गझलकार भीमराव पांचाळे म्हणाले, तरूण पत्रकारांची समाजाला गरज आहे, तरूण युवकांनी लिहित राहिले पाहिजे असे म्हणत त्यांनी सत्काराचा स्विकार केला. कार्यक्रमात साहित्य, कला आणि पत्रकारितेतील दिग्गजही उपस्थित होते. ज्येष्ठ गझलकार भीमराव पांचाळे, पद्मश्री पुरस्कार विजेते प्रभू हरणे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत, तसेच संघाचे ब्रँड अँबेसिडर संजय फुलसुंदर या मान्यवरांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली.

### एकीनेच नवी पत्रकारिता उभी राहील : श्री. आरोटे

**श्री. आरोटे म्हणाले, आजच्या काळात सोशल मीडिया आणि डिजिटल न्यूजच्या वेगवान स्पर्धेत पारंपरिक वृत्तपत्रांनी एकत्र आल्याशिवाय भविष्य सुरक्षित नाही. “पत्रकारांनी एकत्र यावे, वृत्तपत्रांनी एकत्र यावे—यातूनच नवी, सशक्त आणि सामाजिक भान असलेली पत्रकारिता आकार घेऊ शकते,” असे त्यांनी आवाहन केले.**

गंगणे म्हणाले, सध्या अनेक माध्यमांमध्ये अनावश्यक स्पर्धेमुळे पत्रकार एकमेकांच्या विरोधात उभे राहतात. एका वृत्तपत्राने केलेल्या बातमीचा उल्लेखही दुसरे वृत्तपत्र करत नाही. “पत्रकारांनी एकीने आणि निर्भीड वृत्तांकनाने समाजासाठी काम करणे हेच मुख्य उद्दिष्ट असायला हवे. परंतु एक वृत्तपत्र दुसऱ्याचे नावही छापत नाही, ही पत्रकारितेची शोकांतिका आहे,” असा टोला त्यांनी लगावला.

त्यांच्या म्हणण्यानुसार, कोणत्याही माध्यमाचा शत्रू दुसरे माध्यम नसते. उलट एका घटनेचा संदर्भ देताना, आधीच प्रकाशित झालेल्या बातम्यांचा उल्लेख केल्यास माहिती अधिक विश्वसनीय होते. परंतु अहंकार आणि स्पर्धा यांमुळे सत्य आणि पारदर्शकता मागे पडते.

प्रतिक गंगणे यांनी पुढे सांगितले की, “पत्रकारिता ही केवळ व्यवसाय नाही, तर लोकशाहीची चौथी स्तंभ म्हणून असलेली जबाबदारी आहे. वृत्तपत्रे आणि डिजिटल माध्यमे एकमेकांसोबत काम करू लागली, तर समाजहिताची पत्रकारिता अधिक बळकट होईल.”

त्यांच्या मते, माहितीची देवाणघेवाण, परस्पर सहकार्य, विश्वास आणि एकमेकांच्या कार्याचा आदर - या चार गोष्टी माध्यमविश्वाला पुढे नेऊ शकतात.



# ताई राजकारणात येणार?

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महिला सक्षमीकरणासाठी आक्रमक भूमिका घेत विविध आंदोलने, मोर्चे आणि सामाजिक प्रश्नांवर आवाज उठवणाऱ्या भूमाता ब्रिगेडच्या संस्थापक अध्यक्षा तृप्ती देसाई यांना राजकारणात सक्रिय सहभाग घ्यावा, अशी मागणी समाजातील विविध क्षेत्रांतून वाढत आहे. महिलांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात लढा देताना त्यांनी दाखवलेली धडाडी, स्पष्ट भूमिका आणि निर्भीड भाष्य यामुळे राज्यातील महिलांमध्ये त्यांच्याबद्दल विशेष विश्वास निर्माण झाला आहे.

सध्या राज्यात महिलांवरील गुन्हे, महिला सुरक्षा, मुलींचं शिक्षण आणि आरक्षणाचे प्रश्न अधोरेखित होत असताना, या सर्व विषयांवर ठाम भूमिका मांडणाऱ्या नेतृत्त्वाची आवश्यकता असल्याचे मत महिला संघटना, सामाजिक कार्यकर्त्या आणि युवकांद्वारे व्यक्त केले जात आहे. तृप्ती देसाई यांनी आतापर्यंत लोकहिताच्या अनेक मुद्द्यांवर तडफदार पद्धतीने आंदोलने केली आहेत. शनि शिंगणापूर मंदिर प्रवेश आंदोलनापासून ते विविध महिला अत्याचार प्रकरणांपर्यंत त्यांनी न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले.

दरम्यान, तृप्ती देसाई यांचे अलीकडील वक्तव्ये आणि त्यांच्या उपक्रमांवरही राजकीय वर्तुळाचे लक्ष केंद्रीत झाले आहे. त्यांनी घेतलेली निर्भीड भूमिका आता राजकीय क्षेत्रात प्रभावीपणे वापरली जाऊ शकते, असा विश्वास अनेक कार्यकर्त्यांचा आहे. महिलांनी फक्त मतदानापुरतेच नव्हे तर स्वयंपूर्णपणे राजकारणात येऊन नेतृत्व घ्यावे, यासाठीही देसाई यांनी वेळोवेळी आवाहन केले आहे.

राज्यातील विविध जिल्ह्यांतून त्यांना उमेदवारी देण्याची मागणी सुरू झाल्याची माहिती पुढे येत आहे. तर काही सामाजिक संघटनांनी त्यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र महिला मोर्चा उभा करण्याचीही तयारी दर्शवली आहे. महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व वाढले तर धोरणात्मक स्तरावर महिलांसाठी अधिक प्रभावी निर्णय घेतले जातील, असेही मत व्यक्त केले जात आहे. तृप्ती देसाई यांनी राजकारणात प्रवेश केल्यास महिला सुरक्षेचे प्रश्न, अत्याचारग्रस्तांना न्याय, महिला सक्षमीकरणातील अडथळे, तसेच सामाजिक सुधारणांचे मुद्दे अधिक जोरकसपणे पुढे नेले जातील, असा जनतेचा विश्वास आहे.

## ठळक बातम्या

### शेतमजूर जखमी!

**ओतूर (आरंभ पर्व) : डोमेवाडी मध्ये मंगळवारी ता.१८ रोजी सकाळी दहा वाजे दरम्यान बिबट्याने शेतमजूरावर हल्ला करून त्याला किरकोळ जखमी केले.सुदैवाने तरुणांच्या प्रसंगावधानाने मोठा अनर्थ टळला आहे.जुन्नर तालुक्यात बिबट्या दिसने किंवा बिबट हल्ला ही नविन गोष्ट नाही परंतू बिबट्याचे दिवसा ढवळ्या हल्ले होऊ लागल्याने सर्वत्र दहशतीचे वातावरण असून शेतात काम करणाऱ्या शेत मजूरांना जीव मुठीत धरून काम करावे लागत आहे.**

# लेशपाल जवळगे यांना ‘युवा प्रेरणा पुरस्कार’ प्रदान

**पिंपरी चिंचवड (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने आयोजित भव्य पुरस्कार सोहळा मोठ्या उत्साहात व दिमाखात पार पडला. पत्रकारिता, साहित्य, सामाजिक कार्य, लोकसंपर्क अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा या मंचावर सन्मान करण्यात आला. समाजजीवनाच्या उन्नतीसाठी कार्यरत असलेल्या कर्तृत्ववान व्यक्तींना राज्यस्तरीय व्यासपीठावर गौरवण्याचा उपक्रम यंदाही उत्साहात झाला. या सोहळ्यात विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम ताई गोऱ्हे व विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमस्थळी दोन्ही मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांनी पत्रकारांचे समाजातील महत्त्वाचे स्थान, साहित्यिकांचे संवेदनशील लेखन, तसेच समाजकार्य करणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाचा विशेष उल्लेख केला. सरहद संस्थेचे लेशपाल जवळगे यांना देण्यात आलेला ‘युवा प्रेरणा पुरस्कार’ कार्यक्रमातील आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.



# कॉलेजजवळच २२ वर्षीय तरुणाची हत्या

- **दगडाने ठेचलं, कोयत्याने वार केले अन्...**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गुन्हेगारीच्या घटनांमुळे सतत चर्चेत असणाऱ्या पुणे शहरात पुन्हा एकदा एका तरुणाची निर्घृण हत्या झाली आहे. सिंहगड कॉलेजजवळ एका 20 ते 22 वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आला आहे. दगडाने ठेचून आणि कोयत्याने वार करून तरुणाची हत्या करण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. सिंहगड रोड पोलीस स्टेशन हद्दीत ही घटना घडली असून, रात्री उशिरा किंवा पहाटे हा खून झाला असावा असा अंदाज आहे. हत्येचा पॅटर्न पाहता हा पूर्वनियोजित कट असल्याचा पोलिसांना संशय आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक नागरिकांनी रस्त्याच्या कडेला तरुणाचा मृतदेह पाहिल्यानंतर तातडीने सिंहगड रोड पोलीस स्टेशनला याबाबतची माहिती दिली. त्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला असून, प्राथमिक पाहणीत तरुणाच्या डोक्यावर दगडाने मारल्याच्या खुणा आणि शरीरावर कोयत्याने वार केल्याचे दिसून आलं आहे.

पोलिसांनी सांगितलं की, "एका 20 ते 22 वर्षीय तरुणाची हत्या करण्यात आली आहे. दगडाने ठेचून आणि कोयत्याने वार करत तरुणाला मारलं असल्याचा संशय आहे." दरम्यान, सध्या, मृत तरुणाची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत, जेणेकरून खुनी कोण आहे याचा छडा लावता येईल. या घटनेमुळे परिसरात भीतीचं वातावरण पसरलं आहे. पुणे आणि परिसरात वारंवार खुनाच्या घटना घडत असल्याचं चित्र आह. पिंपरीत काही दिवसांपूर्वीच मित्रांनी फॉर्च्युनर कारमध्ये तरुणाची हत्या केली होती. नितीन गिलबिले यांची वडमुखवाडी-अलंकापुरम रस्त्यावर फॉर्च्युनर गाडीत हत्या झाली. या हत्येचा कट चार जणांनी रचला होता, अशी माहिती पोलीस तपासात समोर आली. अमित पठारे, विक्रांत ठाकूर, सुमित पटेल आणि आकाश पठारे अशी आरोपींची नावे आहेत. प्राथमिक तपासात आर्थिक व्यवहारातून हा खून झाल्याचे समोर आले आहे. अटक झालेल्या दोन आरोपींवर यापूर्वीही गुन्हे दाखल आहेत.




# फाळणी, काश्मीर आणि नेहरु

पं. नेहरूंवर 'काश्मीरचा प्रश्न त्यांच्यामुळेच वाढला,' असा आरोप आजही होतो; परंतु त्या काळच्या परिस्थितीत त्यांचा उद्देश भारताच्या धर्मनिरपेक्षतेचे संरक्षण हा होता. नेहरू-पटेल या दोघांच्या एकत्रित प्रयत्नांशिवाय आजचा भारत शक्य झाला नसता. पंडित नेहरूंच्या जन्मदिनानिमित्त लेख...

भारतीय जनतेसाठी १५ ऑगस्ट १९४७ हा स्वातंत्र्याचा सुवर्णक्षण; पण त्या स्वातंत्र्याच्या तेजोमय प्रकाशात रक्ताचे डागही होते. एका बाजूला भारतीयांनी ब्रिटिश राजवटीच्या बेड्या तोडून नव्या युगात प्रवेश केला, तर दुसरीकडे लाखो लोक विस्थापित झाले, असंख्य कुटुंबे उद्ध्वस्त झाली. स्वातंत्र्य आणि फाळणी या एकाच नाण्याच्या दोन बाजू ठरल्या.

ब्रिटिशांनी सत्ता हस्तांतरणाची घाई केली आणि त्यातून भारत व पाकिस्तान या दोन देशांचा जन्म झाला; पण मानवी इतिहासातील सर्वात मोठ्या स्थलांतराच्या किमतीवर. ही फाळणी केवळ भौगोलिक नव्हे, तर सांस्कृतिक, धार्मिक आणि मानसिक विभागणी होती. पंजाब आणि बंगालमधील हत्याकांडांनी मानवतेला हादरवले. कोट्यवधींना घरदार, भूमी आणि ओळख गमवावी लागली; सुमारे दहा लाख लोकांनी जीव गमावला. म्हणून इतिहासाचे अभ्यासक म्हणतात, हे स्वातंत्र्य 'रक्ताच्या शाईने लिहिलेले' होते.

त्या काळी भारतात ५६५ संस्थाने होती. प्रत्येक संस्थान स्वतःचे स्वायत्त राजेशाही रूप धारण करून होते. त्यांचे भारत किंवा पाकिस्तानमध्ये विलीनीकरण हा गुंतागुंतीचा प्रश्न होता. सरदार वल्लभभाई पटेल यांनी राजकीय दूरदृष्टी आणि प्रशासनकौशल्याने बहुतांश संस्थानांचे विलिनीकरण साधले. मात्र, जम्मू-काश्मीरचा प्रश्न वेगळा ठरला. महाराज हरीसिंग हे हिंदू; पण लोकसंख्या प्रामुख्याने मुस्लिम; त्यामुळे त्यांची भूमिका अनिश्चित राहिली. त्यांनी स्वतंत्र राहण्याचा पर्याय ठेवला; पण ऑक्टोबर १९४७मध्ये पाकिस्तानकडून पाठवलेल्या कबायली सैन्याने काश्मीरवर आक्रमण केले. या संकटात त्यांनी भारताकडे मदतीची विनंती केली. महाराजांच्या सहीनंतर भारताने सैन्य पाठवून मोठा भाग मुक्त केला. या निर्णायक क्षणी पंडित नेहरूंची भूमिका महत्त्वाची ठरली. त्यांनी संघर्षाला आंतरराष्ट्रीय वैधता मिळावी म्हणून संयुक्त राष्ट्रांकडे तक्रार दाखल केली. त्यांच्या दृष्टीने हे नैतिक आणि पारदर्शक पाऊल होते; परिणामी काश्मीर प्रश्न भारताच्या सीमांच्या बाहेर गेला. १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने जनमताचा उल्लेख असलेला ठराव ४७ मंजूर केला; पण पाकिस्तानने आपले सैन्य मागे न घेतल्याने तो अमलात आला नाही.



नेहरूंवर 'काश्मीरचा प्रश्न त्यांच्यामुळेच वाढला' असा आरोप आजही होतो; परंतु त्या काळच्या परिस्थितीत त्यांचा उद्देश भारताच्या धर्मनिरपेक्षतेचे संरक्षण हा होता. नेहरू आणि पटेल यांच्यात धोरणात्मक मतभेद असले तरी दोघांचाही हेतू राष्ट्राच्या एकात्मतेचा होता. पटेल व्यवहारवादी, नेहरू आदर्शवादी. काश्मीरचा विषय नेहरूंकडे, तर इतर संस्थानांचे विलीनीकरण पटेलांकडे होते. लॉर्ड माउंटबॅटन यांच्या घाईगडबडीच्या सत्ता हस्तांतरणामुळे परिस्थिती आणखी गुंतागुंतीची बनली. त्यांनी नेहरू–पटेल मतभेदांचा काही अंशी राजकीय फायदा घेतल्याचे इतिहासकार सांगतात. तरीही, या दोघांच्या एकत्रित प्रयत्नांशिवाय आजचा भारत शक्य झाला नसता.

स्वातंत्र्यानंतर नेहरूंनी लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष भारताचा पाया रचला. त्यांनी सामाजिक न्याय, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांचा आग्रह धरला. नेहरूंच्या नेतृत्वाखालील घटना समितीने १९५०मध्ये लोकशाही संविधान तयार केले. संसद, न्यायव्यवस्था आणि निवडणूक आयोगासारख्या संस्था मजबूत केल्या. औद्योगिकीकरण, विज्ञान, शिक्षण या क्षेत्रांना त्यांनी विकासाचा पाया मानले. आयआयटी, आयआयएम, सीएसआयआर, इस्रो, बीएआरसी, डीआरडीओ या संस्था स्थापन केल्या, 'विज्ञान मंदिरे' म्हणून त्यांना प्रोत्साहन दिले. भाक्रा नांगल धरण, दामोदर खोरे प्रकल्पांतून जलविद्युत आणि सिंचन क्रांती घडवली. सोव्हिएत मॉडेलवर आधारित त्यांनी पहिली पंचवार्षिक योजना (१९५१) सुरू केली. भिलाई, राउरकेला, दुर्गापूर सारखे पोलाद प्रकल्प उभारले. सार्वजनिक क्षेत्राला प्राधान्य देऊन स्वावलंबी अर्थव्यवस्था घडवली. शिक्षण आणि समाजसुधारणा क्षेत्रातही त्यांनी अत्यंत दूरदृष्टीने काम केले. प्राथमिक शिक्षणाचा विस्तार, विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना हे त्यांच्या कार्यकाळात घडले. अंधश्रद्धांमध्ये रुतलेल्या समाजामध्ये शिक्षणाच्या माध्यमातून वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवला. हिंदू कोड बिलद्वारे स्त्रियांना समान हक्क दिले. भाषा, धर्म, प्रांतवादावर मात करून एकात्मतेची संकल्पना रुजवली. नेहरूंच्या दूरदृष्टीमुळे आधुनिक भारत घडला, हे कुणीही नाकारू शकणार नाही.

आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांनी शीतयुद्धाच्या काळात अलिप्ततेचा मार्ग निवडला, कोणत्याही महासत्तेच्या ताब्यात न जाण्याचा निर्धार त्यांनी ठेवला. त्यांच्या परराष्ट्र धोरणामुळे भारताची प्रतिमा एक नैतिक आणि स्वतंत्र देश म्हणून उभी राहिली. तथापि, १९६२च्या चीन युद्धाने त्यांच्या विश्वासधोरणाला धक्का दिला. त्यानंतर त्यांच्या आरोग्यावर परिणाम झाला; तरीही भारताच्या लोकशाहीचा पाया मजबूत ठेवण्यात आणि जागतिक पटलावर प्रतिष्ठा मिळवण्यात त्यांचे योगदान अमूल्य राहिले.

फाळणीनंतर हिंदू–मुस्लिम संबंधांमध्ये तणाव वाढला. या जखमा सीमांपुरत्या न राहता समाजाच्या मनात खोलवर रुजल्या. आजही काही राजकीय शक्ती या ऐतिहासिक जखमांचा उपयोग समाजात विभागणी निर्माण करण्यासाठी करतात. 'काश्मीर प्रश्न नेहरूंमुळेच' किंवा 'फाळणीसाठी अमुक जबाबदार' अशा आरोपांतून इतिहासाचे राजकारण घडते, म्हणजेच भूतकाळाचा उपयोग सत्तेसाठी होतो. आज राजकारणात इतिहासातील नेत्यांची प्रतिमा हे प्रचाराचे शस्त्र बनले आहे. परंतु इतिहासाचा खरा उपयोग दोषारोपासाठी नव्हे, तर चिंतन आणि दिशा शोधण्यासाठी असावा. १९४७च्या नेत्यांनी परिस्थितीच्या मर्यादेत राहून घेतलेले निर्णय काही योग्य, काही विवादास्पद असतीलही; परंतु राष्ट्रनिर्मिती हाच त्यांचा हेतू होता. २०१९ मध्ये केंद्र सरकारने कलम ३७० रद्द करून जम्मू–काश्मीरचा विशेष दर्जा संपवला. भारतासाठी हा निर्णय एकात्मतेचा आणि विकासाचा टप्पा होता, तर पाकिस्तानने त्याला आंतरराष्ट्रीय मुद्दा बनवण्याचा प्रयत्न केला. मात्र, बहुतांश देशांनी हे भारताचा अंतर्गत विषय मानले.

# वैशाली पाटील यांना 'राष्ट्रीय भारत भूषण' पुरस्काराने सन्मानित



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

समाज उत्थान, महिला सक्षमीकरण आणि विविध सामाजिक जनजागृती उपक्रमांमध्ये सातत्याने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कुसुमवत्सल्य फाउंडेशन ट्रस्ट, पुणे यांच्या संस्थापक व अध्यक्षा सौ. वैशाली पाटील यांना नुकताच प्रतिष्ठेच्या 'राष्ट्रीय भारत भूषण पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. पुणे येथील भारत इतिहास संशोधन मंडळ, सदाशिव पेठ येथे हा दिमाखदार सोहळा पार पडला.

राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर चाललेल्या विविध सामाजिक उपक्रमांमध्ये वैशाली पाटील यांनी दाखवलेले नेतृत्वगुण, संवेदनशील दृष्टिकोन आणि संकटग्रस्तांसाठी केलेले कार्य यामुळे त्यांना हा दुहेरी सन्मान घोषित करण्यात आला.

यातील दोन पुरस्कार खालीलप्रमाणे :

पहिला पुरस्कार: समाजातील वंचित, निराधार, महिलांवरील अत्याचारग्रस्त, तसेच अनाथ मुलांसाठी त्यांनी केलेल्या निःस्वार्थ व समर्पित सेवेला मानाची दाद मिळाली.

दुसरा पुरस्कार: महिला सुरक्षा, अँटी-हॅरेसमेंट जनजागृती, शिक्षण व स्वावलंबनासाठी राबवलेल्या उपक्रमांचे विशेष कौतुक करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मेघराजराजे भोसले, प्रा. डॉ. शंकर अदानी, पोलिस उपअधीक्षक सुदेश पाटील, मराठी चित्रपट अभिनेत्री प्रणिता खरपुडे, कवयित्री व सामाजिक कार्यकर्त्या वैशाली शेलार, मराठी चित्रपट अभिनेता शुभम कुमार, संदीप रमेश शर्मा, विपिन म. देशमुख, तसेच संस्थापक अध्यक्ष सचिन हळदे आदी मान्यवर उपस्थित होते.

## 'हा गौरव मोठ्या जबाबदारीसाठी मार्गदर्शक'

**पुरस्कार स्वीकारल्यानंतर आपल्या भावना व्यक्त करताना वैशाली पाटील म्हणाल्या, "समाजासाठी काहीतरी चांगलं करण्याची प्रेरणा मला माझ्या लोकांकडून मिळते. हा सन्मान केवळ माझा नसून, माझ्या टीमचा, माझ्या मार्गदर्शकांचा आणि मला साथ देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा आहे. हा गौरव आम्हाला अजून मोठ्या जबाबदाऱ्या स्वीकारण्यासाठी मार्गदर्शक ठरतो." वैशाली पाटील यांच्या सामाजिक कार्याची दखल या दोन्ही पुरस्कारांमुळे राज्यभरातून घेतली जात असून, समाजातील विविध घटकांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.**

## समाजसेवेत मोलाचे योगदान!

# ताथवडे-पुनावळे सोसायटी लीग २०२५चे उत्साहपूर्ण उद्घाटन



**ताथवडे/पुनावळे (दै. आरंभ पर्व)**

ताथवडे-पुनावळे सोसायटी लीग 2025 या भव्य क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन शिवसेना नेते व आमदार आदरणीय श्री. सचिनजी आहिर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या प्रसंगी उपस्थित राहण्याचा मान मला लाभला. कार्यक्रमात शिवसेना पक्षाचे संघटक श्री. संजोग वाघेरे, माजी उपमहापौर श्री. प्रभाकर वाघेरे, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष श्री. प्रशांत शितोळे, दत्ता वाघेरे यांच्यासह विविध सोसायटीतील सदस्य व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटन सोहळा उत्साह, जल्लोष आणि क्रीडाभावनेने भरलेला होता. स्थानिक पातळीवर युवांच्या क्रीडाविकासाला चालना देण्यासाठी ही स्पर्धा एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

या उपक्रमाचे उत्कृष्ट नियोजन युवानेते चेतन (अण्णा) पवार यांनी केले असून, त्यांनी या स्पर्धेचे उद्दिष्ट "सोसायटीतील युवकांना एकत्र आणून क्रीडामनभाव विकसित करणे" असे सांगितले. चेतन पवार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, पुरुष आणि महिला अशा दोन्ही गटांसाठी आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.

# आयडी फ्रेश फूडद्वारे ब्रेकफास्ट पोर्टफोलिओचा विस्तार

- **प्रीझर्वेटिव्ह-फ्री पॅनकेक बॅटर लाँच केले**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आयडी फ्रेश फूड या भारतातील सर्वात लोकप्रिय फ्रेश फूड ब्रँडने नवीन आयडी पॅनकेक बॅटरच्या लाँचची घोषणा केली आहे; हे रेडी-टू-कूक, ताजे, प्रीझर्वेटिव्ह-फ्री बॅटर ब्रेकफास्टसोबत मऊ, स्वादिष्ट पॅनकेकचा आस्वाद घेण्याचा आनंद देते. विशेषतः कुटुंब व लहान मुलांसाठी डिझाइन करण्यात आलेले हे उत्पादन आयडीच्या जागतिक ब्रेकफास्ट क्षेत्रातील प्रवेश दर्शवते, तसेच ब्रँडच्या क्लीन-लेबल, प्रीझर्वेटिव्ह-फ्री तत्त्वामध्ये सामावून जाते.

पावडरमधील मिश्रणे आणि प्रीझर्वेटिव्ह्जवर अवलंबून असलेल्या समकालीन पॅनकेकच्या तुलनेत आयडीचे पॅनकेक बॅटर घरगुती बॅटरप्रमाणे ताजे बनवले जाते. गुळगुळीत व मऊ पोत त्वरित व सहजपणे पॅनकेक बनवण्याची खात्री देतो, ज्यामुळे ब्रेकफास्ट तयार करणे सोपे, सहज व आनंददायी होते. बॅटरमध्ये अंडी वापरण्यात आलेली नाहीत, तसेच कृत्रिम फ्लेवर्स नाहीत आणि उत्तम सामग्रीसह तयार करण्यात आले आहे, ज्यामधून आयडीचा प्रामाणिकपणा व आरोग्याप्रती कटिबद्धता दिसून येते. या लाँचबाबत मत व्यक्त करत आयडी फ्रेश फूडचे चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर (भारत) रजत दिवाकर म्हणाले, आयडी पॅनकेक बॅटरसह आम्ही मोठ्या प्रमाणात कोरड्या मिश्रणांवर अवलंबून असलेल्या ब्रेकफास्ट श्रेणीमध्ये शुद्धता व ताजेपणा आणण्याप्रती आमची कटिबद्धता वाढवत आहोत. ग्राहकांची जीवनशैली बदलत असताना सोयीसुविधा व विश्वसनीयता देणाऱ्या उत्पादनांसाठी आणि दर्जाबाबत तडजोड न करता त्वरित तयार करता येणाऱ्या फूडसाठी मागणी वाढत आहे. हे लाँच भारतातील कुटुंबांसाठी दैनंदिन आहाराला नवीन स्वरूप देण्याच्या दिशेने धोरणात्मक पाऊल आहे, ज्यामधून आयडीची क्लीन-लेबल, प्रीझर्वेटिव्ह-फ्री फूडप्रती कटिबद्धता दिसून येते.

आयडी पॅनकेक बॅटर प्रथम बेंगळुरू, दिल्ली एनसीआर, पुणे व महाराष्ट्रामध्ये क्विक-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवर उपलब्ध असेल, ज्यानंतर टप्प्याटप्प्याने देशभरातील आधुनिक ट्रेड व प्रमुख रिटेल आऊटलेट्समध्ये उपलब्ध होईल.

हे उत्पादन विकसित करण्याच्या प्रवासाबाबत मत व्यक्त करत आयडी फ्रेड फूडमधील नवीन उत्पादन विकासाच्या प्रमुख एनाक्षी दासगुप्ता म्हणाल्या, आमच्या ट्रान्सपरन्सी मोहिमेमध्ये आयडी पॅनेकेक बॅटरसाठी संकल्पना निर्माण झाली, जेथे मुले किचनमध्ये प्रयोग करण्याप्रती त्यांची आवड शेअर करतात, तसेच आम्हाला पॅनकेक बॅटर तयार करण्याबाबत विचारतात. आमची काहीतरी वेगळे करण्याची महत्त्वाकांक्षा होती, जे पालक व मुलांमध्ये सर्जनशीलता आणि दृढ नात्याला चालना देईल. यामधून क्लीन-लेबल, प्रीमियम घटकांसह बनवण्यात आलेले ताजे व अंडी नसलेले पॅनकेक बॅटर तयार करण्यात आले आहे. मऊ, गुळगुळीत पोत व घरगुती पॅनकेकचा स्वादिष्ट फ्लेवर देण्यासाठी डिझाइन करण्यात आलेले हे पॅनकेक बॅटर भारतातील कुटुंबांना सहजपणे ब्रेकफास्ट तयार करण्याची सुविधा देते. हे उत्पादन आरोग्यदायी, पौष्टिक आणि खाण्यास उत्तम आहे.

हे उत्पादन दोन व्हेरिएण्ट्समध्ये उपलब्ध आहे - क्लासिक पॅनकेक बॅटर आणि चोको पॅनकेक बॅटर, ज्यांची किंमत अनुक्रमे 300 ग्रॅम पाऊचसाठी 75 रूपये व 120 रूपये आहे, तसेच रेफ्रिजरेटमध्ये 5 दिवसांपर्यंत स्टोअर करून ठेवता येऊ शकते.

आयडी फ्रेशचे पॅनकेक बॅटर उत्तम, मुलांसाठी अनुकूल उत्पादन आहे, जे ब्रेकफास्टला परस्परसंवादी, स्वादिष्ट आणि सहजसाध्य बनवते.

# सायकलवरून 'गावगाथा'चा सुगंध पसरवणारा एक अवलिया

## धोंडपा नंदे : वाचन, पर्यावरण आणि मातीतल्या माणसांचा खरा दूत!

**ना दिखावा, ना प्रसाराचा गाजावाजा फक्त वाचनाची ओढ आणि मराठी संस्कृतीप्रती असलेलं जिव्हाळ्याचं प्रेम. त्यांच्या सायकलसोबत फिरते एक आशा की अजूनही या जगात काही लोक "वाचन" हा उत्सव मानतात, "शब्द" हा त्यांचा धर्म आहे, आणि "गाव" ही त्यांची ओळख आहे. धोंडपा नंदे हे खऱ्या अर्थाने साहित्याचे सायकलस्वार, वाचनसंस्कृतीचे वाहक, आणि मातीशी नातं जोडलेला अवलिया!त्यांचा प्रवास हे दाखवतो की— जर मनात निष्ठा असेल, तर सायकलवरूनही संस्कृती पोचवता येते. गावगाथा दिवाळी अंक — ग्रामीण भावनांचा, संस्कृतीचा आणि प्रेरणेचा ठेवा सायकलवरून सुरु झालेला हा प्रवास आज 'वाचनाचा महोत्सव' बनला आहे.**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्याच्या गर्दीच्या रस्त्यांवर, मोटारींचा आवाज आणि धावपळीच्या जीवनात एक माणूस मात्र शांतपणे सायकलवरून पुढे सरकतो त्याच्या हातात दोन दिवाळी अंक, 'गावगाथा'चे! आणि त्या अंकांबरोबर तो पोचवतो एक सुगंध...

गावाच्या मातीतला, माणुसकीचा आणि वाचनसंस्कृतीचा. हा प्रवास आहे सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील वागदरी गावचे सुपुत्र धोंडपा नंदे यांचा जीवनातल्या संघर्षातून उभं राहिलेलं हे नाव आज प्रेरणादायी ठरलं आहे. सन १९९७ मध्ये परिस्थितीशी झुंज देत शिक्षणासाठी पुण्यात आले.

काम, शिक्षण, जबाबदाऱ्या — सगळं सायकलवरूनच!त्या काळात सुरू झालेला सायकल प्रवास आजही कायम आहे.२८ वर्षांचा सायकल प्रवास म्हणजे एक सवय नाही, ती एक जीवनशैली झाली आहे.त्यांचं सायकलवरचं प्रत्येक पेडल म्हणजे एक संदेश —"पर्यावरण जपा, आरोग्य जपा आणि वाचन वाढवा."

गेल्या २५ वर्षांपासून मुक्त पत्रकार म्हणून लेखणी हातात घेतलेली ही व्यक्ती आजही समाजातील प्रश्न, प्रेरणादायी कथा आणि लोकजीवन यावर सातत्याने लिहिते.शब्दांमधून लोकांना विचार करायला लावणं आणि कृतीतून प्रेरणा देणं — हेच त्यांचं ब्रीद गेल्या चार वर्षांपासून ते स्वतः संपादन करतात 'गावगाथा दिवाळी अंक'गावातील लोकजीवन, परंपरा, संस्कृती, आणि बदलाचं दर्शन घडवणारा सुंदर लेखसंग्रह.पण या अंकाचं खरं वैशिष्ट्य म्हणजे —ते हे अंक स्वतः सायकलवरून पुण्यातील पुस्तक विक्रेत्यांपर्यंत आणि वाचकांच्या हातात पोचवतात!

**- संपर्क : ९८५०६१९७२४**



## थोडक्यात पण महत्वाचे



### वारजे मुठा नदीवरील पुलाची सुळे यांच्याकडून पाहणी

**पुणे (आरंभ पर्व) : बारामती लोकसभा मतदारसंघातील वारजे, पुणे येथील नदीवरील पुलाच्या कामाची खासदार सुप्रिया सुळे यांनी पाहणी केली. या पुलाचे काम पूर्ण होत आले असून फेब्रुवारीमध्ये पुलाची एक लेन सुरू करण्यात येणार आहे, तर मे मध्ये हा पूल वाहतुकीसाठी पूर्णपणे खुला करण्यात येणार आहे. अशी माहिती खासदार सुप्रिया सुळे यांनी यावेळ दिली. या पुलामुळे वारजे भागात होणारी वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार आहे. या पुलाचे काम पूर्ण होण्यासाठी माजी नगरसेवक सचिन दोडके आणि सहकाऱ्यांनी विशेष पाठपुरावा केला होता. त्यामुळे लवकरच हा पूल वाहतुकीसाठी खुला होणार आहे असेही सुळे यांनी यावेळी सांगितले. यावेळी अधिकाऱ्यांना काही सूचनाही केल्या. त्यामुळे भविष्यामध्ये या भागातील वाहतूक कोंडी कमी होईल असा विश्वास द्यावे व्यक्त करण्यात आला.याप्रसंगी माजी नगरसेवक सचिन दोडके, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष सोपान काका चव्हाण, खडकवासला ग्रामीणचे अध्यक्ष त्रिंबक अण्णा मोकाशी, किशोर कांबळे, दीपक बेलदरे, सुरेखाताई दमिष्ठे, हनुमंत शिऊर, नीलेश दमिष्ठे अधिकारी यांच्यासह नागरिक, पदाधिकारी आदी उपस्थित होते.**

### धायरीमधील मलनि:स्सारण वाहिनीची दुरुस्ती

**पुणे (आरंभ पर्व) : गणेशनगर येथील अभिरुची धायरीमधील स्वीट्सजवळ मलनि:स्सारण वाहिनी वारंवार तुंबत होती. ही वाहिनी जुनी आणि कमी व्यासाची असल्याने धायरी बस स्टॉप ते अभिरुची स्वीट्स या धायरीतील मुख्य रस्त्यावर वारंवार मलनिस्सारण वाहिनी तुंबण्याच्या घटना घडत होत्या. त्यामुळे दूषित पाणी रस्त्यावर येत होते. महापालिकेकडून तात्पुरत्या स्वरूपात दुरुस्ती केली. जायची परंतु कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून माजी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे यांनी महापालिकेशी पत्रव्यवहार केला होता. २०२५-२६ या चालू आर्थिक वर्षात डी. एस. के. चौक ते आकाशदीप कमान या मुख्य रस्त्यावर मोठ्या व्यासाची मलः निस्सारण वाहिनी टाकण्यात येणार आहे. त्यासाठी ८० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून, लवकरच निविदा प्रक्रिया राबवण्यात येणार आहे.**



### २९व्या 'वेल बिल्ट स्ट्रक्चर कॉम्पिटिशन'चे आयोजन : अजय गुजर

**पुणे (आरंभ पर्व) : सार्वजनिक विकास प्रकल्प, बांधकाम क्षेत्रातील महत्वपूर्ण संस्था असलेल्या बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया (बीएआय) पुणे सेंटरच्या वतीने प्रतिष्ठित अशा राष्ट्रीय स्तरावरील 'वेल बिल्ट स्ट्रक्चर कॉम्पिटेशन' या वार्षिक स्पर्धेचे आयोजन केले आहे. स्पर्धेचे हे २९ वे वर्ष आहे, अशी माहिती 'बीएआय' पुणेचे अध्यक्ष अजय गुजर यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी 'बीएआय' महाराष्ट्र अध्यक्ष जगन्नाथ जाधव, सचिव मनोज देशमुख, स्पर्धेचे समन्वयक सुनील मते, पुणे सेंटरचे उपाध्यक्ष राजाराम हजारे व महेश मायदेव, सचिव सी. एच. रतलानी, खजिनदार महेश राठी यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. अजय गुजर म्हणाले, "बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया पुणे सेंटर हे देशभरातील २५० पेक्षा अधिक सेंटरपैकी सर्वात सक्रिय आणि उत्साही असे सेंटर आहे. वर्षभरात स्टडी सर्कल, सेमिनार, कार्यशाळा, स्टुडंट इंटर्नशिप प्रोग्राम्स, राष्ट्रीय स्पर्धा, गुणवंतांचा सत्कार असे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. 'वेल बिल्ट स्ट्रक्चर स्पर्धा' ही त्यापैकीच एक प्रतिष्ठित स्पर्धा आहे. सहकारी कंत्राटदार, बांधकाम व्यावसायिक व बिल्डर्स यांनी केलेल्या उत्कृष्ट आणि उच्च-गुणवत्तेच्या कामाला सन्मान देणारी ही स्पर्धा आहे. बांधकाम उद्योगाची प्रतिमा उंचावण्यासह कंत्राटदारांना त्यांचे कार्य अधिक गुणवत्तापूर्ण करण्यासाठी प्रेरणा देणारी ही स्पर्धा आहे.**




दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
मंगळवार, दि. १८ नोव्हेंबर २०२५









# ‘खेळ रंगला पैठणीचा’ भव्य कार्यक्रम उत्साहात संपन्न

## बाप्पूसाहेब पोकळे पाटील यांनी केले आयोजन



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक ३४ मधील नऱ्हे येथील कैशोरी प्रांगणात दिवाळीच्या निमित्ताने प्रसिद्ध निवेदक क्रांतीनाना मळेगावकर आयोजित केलेला ‘न्यू होम मिनिस्टर – खेळ रंगला पैठणीचा’ हा भव्य कार्यक्रम हजारो महिलांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत दिमाखात पार पडला. संपूर्ण परिसरात महिलांच्या आनंदाचा, हास्याचा आणि उत्साहाचा जल्लोष अनुभवायला मिळाला. हा उपक्रम मा. भीमराव अण्णा तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच खडकवासला भाजपा सरचिटणीस श्री. बापूसाहेब बाबासाहेब पोकळे (पाटील) आणि श्री संकल्प फाउंडेशनच्या कार्याध्यक्षा सौ. प्रितीताई बापूसाहेब पोकळे (पाटील) यांच्या संकल्पना आणि आयोजनातून पार पडला. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन आणि व्यवस्थापन बापूसाहेब पोकळे मित्र परिवार यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक केले. कार्यक्रमात विविध मान्यवरांनी उपस्थित राहून महिलांना प्रोत्साहन दिले. यामध्ये भाजपा शहराध्यक्ष धीरज घाटे, मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे, रुपेश घुले पाटील, माजी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे, सारंगदादा नवले, सागर भूमकर, तुषार श्रीहरी पोकळे, माजी नगरसेविका नीताताई दांगट, जयश्रीताई भूमकर, कोमल सतीश कुटे, अश्विनी किशोर पोकळे, अतुल चाकणकर, माधुरी चाकणकर , रोहिणी राहणे कोमल सुशांत कुटे , गंगाधर भडावळे,अतुल दांगट, दत्ताभाऊ कोल्हे, किरण हगवणे, सुभाष नाणेकर, जयश्रीताई पोकळे,आदी मान्यवरांचा समावेश होता. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला अधिक भव्यता प्राप्त झाली. महिलांसाठी आयोजित विविध मनोरंजक स्पर्धा आणि खेळांमुळे कार्यक्रमात उत्साहाची लाट उसळली. विजेत्या महिलांना इलेक्ट्रिक स्कूटी, फ्रिज, स्मार्ट टीव्ही, होम थिएटर, इलेक्ट्रॉनिक अप्लायन्सेस आणि पैठणी अशी आकर्षक व उपयुक्त बक्षिसे देण्यात आली. अनेक सर्वसामान्य कुटुंबातील महिलांच्या डोळ्यांत बक्षिसे मिळाल्यानंतर आनंदाश्रू दाटून आले. कार्यक्रमादरम्यान हजारो महिलांनी स्वादिष्ट भोजनाचा लाभ घेतला आणि उत्तम व्यवस्थेमुळे भोजन सोहळा सुरळीत पार पडला.

अलीकडील अपघातात मृत्यू पावलेल्या नागरिकांना कार्यक्रमाच्या ठिकाणी काही क्षण शांतता पाळून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. संपूर्ण प्रभागात उत्साह, भव्यता आणि महिलांच्या प्रचंड सहभागामुळे हा उपक्रम सध्या चर्चेचा प्रमुख विषय ठरला आहे.

## कनेक्टिंग ट्रस्टतर्फे नोव्हेंबरमध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आत्महत्या प्रतिबंधासाठी कार्यरत कनेक्टिंग ट्रस्टच्या वतीने २० व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून २८ ते ३० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. ‘आत्महत्या प्रतिबंध आणि मानसिक आरोग्यासाठी नवीन दृष्टिकोन’ या विषयावर सलग तीन दिवस विचारमंथन होणार आहे. ही परिषद पुण्यातील हॉटेल तरवडे क्लार्क्स इन, शिवाजीनगर, पुणे येथे होणार आहे, अशी माहिती संस्थेच्या सँडी अर्नाडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी ट्रस्टचे सल्लागार मंडळ



सदस्य वीरेन राजपूत व अमीना अजाने, प्रशिक्षक डॉ. आदिती आर., स्वयंसेवक दीपाली वीरमालवार व लॉरेन डेव्हिड आदी उपस्थित होते. सँडी अर्नाडे म्हणाल्या, "आत्महत्या प्रतिबंधासाठी खुला संवाद, सामायिक अंतर्दृष्टी आणि सामूहिक कृती यांवर परिषदेत लक्ष केंद्रित केले जाईल. आत्महत्यांचे प्रमाण का वाढत आहे आणि कोणते उपाय प्रभावी ठरत आहेत, अशा महत्त्वाच्या प्रश्नांवर या परिषदेत चर्चा होणार आहे.

## धोकादायक विद्युत समस्या आणि मूलभूत सुविधांची पाहणी

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक ३३ मधील जे.पी. नगर परिसरात ओव्हरहेड एलटी लाईनची सतत तारा तुटण्याची समस्या गंभीर बनली आहे. वारंवार विजेचा पुरवठा खंडित होणे, तारा खाली पडून जीवितास धोका निर्माण होणे यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे. या धोकादायक परिस्थितीची दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश प्रवक्ते राहुलभाऊ पोकळे, माजी सरपंच सौरभनाना मते आणि युवा नेते अविनाशजी लगड यांनी सदर ठिकाणी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.



पाहणीदरम्यान त्यांनी तत्काळ विद्युत विभागाशी संपर्क साधून तारा बदलणे, स्ट्रीटलाईट दुरुस्ती, MC-B वायर अंडरग्राऊंड करण्याची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी केली.

या व्यतिरिक्त जे.पी. नगरमधील ड्रेनेज लाईन अडथळे, खराब रस्ते, सार्वजनिक स्वच्छतागृहाची दुरुस्ती आणि शाळेच्या इमारतीतील त्रुटी यावरही तातडीने कारवाई करण्याबाबत मागणी करण्यात आली.

यावेळी स्थानिक नागरिक नागेश शिंदे, बाबा कांबळे, शुभम शिंदे, कुमार दुपारगुडे, विक्रम बागडे, धनंजय बनसोडे, रवी गायकवाड, निलंकठ गायकवाड, गिरीश भंडारी यांनीही विविध समस्या मांडल्या.

यावेळी “जेपी नगरमधील प्रत्येक समस्या प्राधान्याने सोडवली जाईल. नागरिकांची सुरक्षा व मूलभूत सुविधा हेच आमचे ध्येय आहे.” असे मत मान्यवरांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी प्रशासनाने यावर लवकरच दखल घेऊ व कामाला सुरुवात करू असे आश्वासन दिले.या पाहणीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये दिलासा निर्माण झाला असून कामे तातडीने मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.


## थोडक्यात पण महत्वाचे



### मोहोळ यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिरास प्रतिसाद

पुणे (आरंभ पर्व) : केंद्रीय राज्य मंत्री आणि पुणे शहराचे लोकप्रिय खासदार नामदार मुरलीधर आण्णा मोहोळ यांच्या वाढदिवसानिमित्त विठ्ठल रुक्मिणी मंदिर उत्तम नगर येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. समाजकार्यासाठी समर्पित असलेल्या या उपक्रमाला उत्तमनगर परिसरातील नागरिकांनी प्रतिसाद दिला. शिबिरामध्ये एकूण ५३ रक्तदात्यांनी रक्तदान करून मानवसेवेचे मोठे उदाहरण घातले. याप्रसंगी केंद्रीय मंत्री मोहोळ यांचे ज्येष्ठ बंधू श्री. प्रभाकर मोहोळ यांनी विशेष भेट देऊन रक्तदात्यांचे मनापासून आभार मानले. “रक्तदान म्हणजे जीवनदान. अशा उपक्रमांमुळेच समाजात सकारात्मकता वाढते,” असे त्यांनी सांगितले. शिबिरास विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. त्यामध्ये माजी सरपंच उमेश सरपाटील, सरपंच संतोष मते, मारुतीभाऊ किंडरे, युवा नेते किशोर पोकळे, दत्ताभाऊ कोल्हे, वैभवजी मुरकुटे, प्रकाश साळवे, गणे वांजळे, अभिषेक धावडे, भगवान गायकवाड, अनिल मते, युवा मोर्चा अध्यक्ष निखिल धावडे, निखिल दांगट, महिला आघाडी अध्यक्षा मनीषा मोरे, हभप ममता दांगट, सायली भोसले आणि अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन मा. स्वीकृत नगरसेवक सचिन दांगट आणि युवा नेते अभिजीत धावडे पाटील यांनी केले. सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या या उपक्रमाबद्दल उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त केले.

### नगराध्यक्ष पदासाठी ११ तर नगरसेवक पदासाठी १६५ अर्ज दाखल



राजगुरूनगर (आरंभ पर्व) : राजगुरूनगर येथील राजगुरुनगर नगरपरिषदेच्या सन २०२५ ते २०३० च्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी सोमवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी नगराध्यक्षपदासाठी सहा उमेदवारांनी अकरा तर २१ नगरसेवक पदासाठी १६५ नामनिर्देशन पत्र दाखल झाल्याची माहिती निवडणुक निर्णय अधिकारी डॉ. वैशाली पाटील यांनी दिली. नगरपरिषद निवडणुकांची धामधूम आता अंतिम टप्प्यात पोहोचली असून, उमेदवारांसाठी आजचा दिवस अत्यंत महत्त्वाचा ठरला.अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असल्याने विविध पक्षांचे उमेदवार, कार्यकर्ते आणि समर्थकांनी शहरात मिरवणूका काढून उमेदवारी अर्ज दाखल केले. दरम्यान नगरपरिषद कार्यालयामध्ये मोठी गर्दी झाली होती. नगराध्यक्षपदासाठी पदासाठी बापूसाहेब किसन थिगळे (शिवसेना उद्धव ठाकरे गट ), किरण चंद्रकांत आहेर (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष), मंगेश वंसतराव गुंडाळ ( शिवसेना शिंदे गट), शिवाजी नंदकुमार मांदळे ( भाजपा), दिपक रामदास थिगळे ( अपक्ष ),गणेश कुमार इंगवले (अपक्ष ) यांनी अर्ज दाखल केले आहेत.

## प्रभाग क्रमांक ३३ च्या विकासासाठी सर्वपक्षीय कमिटी स्थापन करण्याचा निर्धार

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

शिवणे–धायरी परिसराचा सर्वांगीण विकास हा एकत्रित नेतृत्व आणि लोकसहभाग यातून शक्य आहे, या विचारातून प्रभाग क्रमांक 33 मध्ये सर्वपक्षीय विकास कमिटी स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. प्रभागातील समस्या, नागरिकांच्या अपेक्षा आणि दीर्घकालीन विकास आराखडा यावर खुली चर्चा करून ठोस तोडगा काढण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला.

**● सीए शैलेंद्र मते समविचारी उच्चशिक्षित नागरिकांना घेऊन उभी करत आहेत लोकचळवळ**

ही लोकचळवळ केवळ निवडणुकीपुरती मर्यादित नसून कायमस्वरूपी जनसेवा करण्याचा संकल्प या कमिटीने स्वीकारला आहे. रस्ते, पाणी, वाहतूक कोंडी, स्वच्छता, स्ट्रीटलाईट, क्रीडा सुविधा, सार्वजनिक सोयी, तसेच धायरी–शिवणे–खडकवासला भागाचा सर्वांगीण विकास यासाठी ही कमिटी एकत्रितपणे काम करणार आहे. सदर चळवळीचा हेतू नागरीक समस्या आणि लोकप्रतिनिधी यांच्यात निवडणुकी नंतर दरी पडू न देणे हा आहे.

या उपक्रमात पुढील नागरिकांनी सहभाग नोंदवला : शैलेंद्र मते, जयवंत कोल्हे, स्वप्निल मते, भाऊसाहेब हगवणे, मनोज मते, गौरव करंजावणे, रमेश मते, पंकज देडगे, रुद्र उपाध्याय, गौरव उपाध्याय

तसेच माजी लोकप्रतिनिधी व संभाव्य उमेदवार : संदीप मते, निलेश दमिष्टे, गोकुळ करंजावणे, नरेंद्र हगवणे, अक्षय शिंदे, रमेश ज्ञानोबा मते यांनीही या सर्वपक्षीय विकास उपक्रमाला सकारात्मक पाठिंबा दर्शवला.

शैलेंद्र मते म्हणाले, “प्रभाग क्रमांक 33 ला आदर्श प्रभाग बनवणे हेच आमचे ध्येय आहे. नागरिकांचे मत, अडचणी आणि सूचनांनुसारच प्रत्येक निर्णय होणार आहे.




# खडकवासल्याचा पैलवान आता महानगरपालिकेच्या आखाड्यात!

## प्रभाग क्रमांक ३३ मधून ‘अष्टपैलू’ राहुलदादा मते सज्ज

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दैनिक आरंभपर्व पुणे यांनी मिशन महानगरपालिका सदरामध्ये प्रभागातील इच्छुक उमेदवारांशी संवाद मालिका सुरू केली आहे. त्यानिमित्त प्रभाग क्रमांक ३३ मधून इच्छुक उमेदवार म्हणून लोकप्रिय, जनसामान्यांचा आवाज आणि खडकवासल्याचा अभिमान मानले जाणारे पैलवान राहुल दादा मते यांच्याशी संवाद साधला. कुस्तीच्या मैदानात आपली छाप पाडलेला हा तरुण आता महानगरपालिकेच्या निवडणुकीतही प्रभागातील जनतेचा लढा लढण्यासाठी आखाड्यात उतरला आहे.



राहुल मते यांनी स्पष्ट केले की, “खडकवासला,किरकटवाडी, नांदोशी, नांदेड , धायरी, शिवणे, उत्तमनगर ,कोपरे आणि कोंढवे–धावडे परिसरात अनेक वर्षांपासून मूलभूत सुविधांची कमतरता आहे. लोकांना स्वच्छ नियमित पुरेसे पाणी, रस्ते, कचरा व्यवस्थापन, ड्रेनेज आणि कर यांसारखे प्रश्न नेहमी त्रास देत आहेत. नागरीकरणाचि खूप मोठी समस्या आहे या भागांना खऱ्या अर्थाने विकसित करण्याच्या उद्देशानेच मी महानगरपालिकेच्या रिंगणात उतरलो आहे. या गावांमध्ये दूरदृष्टीने कामाचे नियोजन आताच करणे आवश्यक आहे आत्ता नाही तर कधीच नाही अशी परिस्थिती आहे बदल हवा आहे आणि तो बदल मी आणणार आहे.”

**शाहू–फुले–आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित असलेले समाजभिमुख कार्य**

राहुल दादा मते यांचे कार्य हे फक्त राजकारणापुरते मर्यादित नाही. ते गेले अनेक वर्षे शाहू–फुले–आंबेडकरांच्या समतावादी आणि मानवतावादी विचारांनी प्रेरित होऊन सामाजिक बांधिलकीचे कार्य करत आहेत. गरीब, श्रमिक, सामान्य माणूस, तरुण, विद्यार्थी, क्रीडापटू—प्रत्येक घटकाच्या प्रश्नांकडे ते विशेष संवेदनशीलतेने पाहतात. या सर्वसमावेशक दृष्टिकोनामुळेच ते आज प्रभागातील नागरिकांमध्ये “विश्वासार्ह व लोकाभिमुख” म्हणून ओळखले जातात.

माझ्याकडे या प्रभागातील जनतेचा विश्वास आहे. आणि हा विश्वासच माझी खरी ताकद आहे.”

## प्रभाग ३३ मधील विजयाबाबत पूर्ण आत्मविश्वास

**राहुल दादा मते म्हणाले, सर्व सोयी सुविधा उपलब्ध सर्वांगसुंदर प्रभाग बनवण्यासाठी “प्रस्थापित नेत्यांपेक्षा मेहनत करणाऱ्या, संघर्षातून आलेल्या आणि खऱ्या अर्थाने जनतेचा मुलगा (उमेदवार)असलेल्या माझ्यासारख्या तरुणाला प्रभाग क्रमांक ३३ ची जनता नक्कीच साथ देईल. सर्वांच्या आशीर्वादाने मी या प्रभागाचा आवाज महानगरपालिकेत ताकदीने पोहोचवणार आहे.”**

**“सोयी नाहीत, पण कर मात्र जाचक – असा अन्याय मी थांबवणार!”**

शिवणे खडकवासला धायरी पार्ट परिसरातील समाविष्ट गावांत अजूनही पुणे मनपाच्या सुविधा पोहोचत नाहीत.

या प्रश्नावर ते म्हणाले,

“लोकांचे उत्पन्न नाही, सुविधा नाहीत… आणि कर मात्र वाढतो आहे. जर मनपाकडून योग्य सेवा देता येत नसतील तर पुन्हा ग्रामपंचायत प्रणालीकडे रुपांतरण करा. जनतेवर अन्याय चालणार नाही.”

त्यांच्या या ठाम भूमिकेला नागरिकांकडून जोरदार समर्थन मिळत आहे.


विकासाचे ‘नंदनवन’ व्हायला हवे असलेला हा प्रभाग अनेक समस्यांनी त्रस्त आहे.

राहुल दादा मते सांगतात, “या भागात कायमस्वरूपी विकासकामे करण्यासाठी मजबूत इच्छाशक्ती आणि जनतेप्रती बांधिलकी आवश्यक आहे. म्हणूनच मी निवडणुकीच्या मैदानात उतरलो आहे.”

राहुल मते फक्त उत्तम कुस्तीपटूच नाहीत तर अष्टपैलू नेतृत्व म्हणून ते खडकवासल्यात ओळखले जातात.

राष्ट्रीय , आंतरविद्यापीठ खेळाडू राज्य सुवर्ण पदक विजेता व कामगार केसरी किताब विजेते आहेत. जनसामान्यांच्या सुख दुःखात अग्रेसर भूमिका, सामाजिक कार्य, युवकांचे प्रश्न, क्रीडा प्रोत्साहन, गरीब कुटुंबांना मदत, परिसरातील समस्या सोडवण्यात त्यांचा सक्रीय सहभाग पाहून तरुण त्यांना आदर्श मानतात. खडकवासला विधानसभा मतदारसंघ कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष असताना नागरिकांच्या समस्या साठी अनेक आंदोलने केली कोरोना काळात पीडित व्यक्तीला व अनेकांना विविध प्रकारच्या माध्यमातून मदतीचा हात पुढे केला आहे यांच्या घराण्यात स्वातंत्र्यसेनानींचा वारसाही असून त्यांची कार्यशैली आजही त्याच प्रेरणेतून पुढे जाते.

# "निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून मला संधी मिळावी; उमेश सरपाटील"



**मिशन महानगरपालिका**
**प्रभाग क्रमांक ३३**

## प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणार; सरपाटील

**(दै. आरंभ पर्व)**

दैनिक आरंभपर्व पुणे यांच्या मिशन महानगरपालिका सदरामध्ये प्रभागातील इच्छुक उमेदवारांशी संवाद मालिका सुरू केली आहे. त्यानिमित्त भाजपाकडून प्रभाग क्रमांक 33 साठी इच्छुक उमेदवार म्हणून पुढे येणारे श्री. उमेश रघुनाथ सरपाटील यांच्याशी दैनिक आरंभपर्वने संवाद साधला. या संवादातून त्यांच्या जनसेवेचा प्रवास, प्रभागाबद्दलची दृष्टी आणि पुढील विकासाची ठोस मांडणी उलगडली.

धायरी – शिवणे – खडकवासला – कोंढवे-धावडे या प्रभागात शांत, प्रामाणिक आणि लोकांसाठी नेहमी उपलब्ध राहणारा चेहरा म्हणून गेली अनेक वर्षे ज्यांच्याकडे पाहिले जाते, ते म्हणजे उमेश सरपाटील. संघर्षातही निष्ठेने काम करणारा, लोकांच्या प्रश्नांसाठी सतत झटणारा आणि कोणत्याही अपेक्षेशिवाय संघटन वाढवणारा नेता म्हणून त्यांची ओळख मजबूत झाली आहे.

कोंढवे धावडे गावाचे सरपंच असताना त्यांनी कचऱ्यासाठी घंटागाडी, काँक्रीट रस्ते, रस्त्यांचे रुंदीकरण, स्वच्छता व्यवस्था, पाणीपुरवठा समस्यांचे निराकरण अशा अनेक विकासकामांना गती दिली. त्यांच्या पाठपुराव्यामुळे गावातील अनेक प्रश्न मार्गी लागले. बारामती लोकसभा कोअर कमिटी सदस्य, पोलीस स्टेशन शांतता समिती सदस्य, शिवणे-उत्तमनगर-कोंढवे धावडे पाणीपुरवठा समिती तसेच विद्युत नियंत्रण समिती सदस्य अशा अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांवर त्यांनी काम केले आहे. शिवाय शिवणे-उत्तमनगर-कोंढवे-कोपरे येथील ज्येष्ठ नागरिक संघाचे ते मार्गदर्शक असून सर्व समाजघटकांमध्ये त्यांचा सन्मान आहे.

भारतीय जनता पार्टीचे सर्व वरिष्ठ नेते व आ. भीमराव तापकीर यांच्याशी त्यांचे चांगले स्नेहसंबंध आहेत. विशेष म्हणजे भारतीय जनता पार्टीच्या संघटनेच्या उपाध्यक्षपदी दोनदा आणि सरचिटणीसपदीही त्यांनी कार्य करत संघटन अधिक सक्षम केले. कार्यकर्त्यांना उभे करणे, प्रभागात पक्षाची ताकद वाढवणे आणि सर्वसामान्यांचा विश्वास जिंकणे यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.

गेल्या 18 वर्षांपासून भाजपा कार्यकर्ता म्हणून निष्ठेने आणि अविरतपणे त्यांनी काम केले आहे. पक्षावर कठीण वेळ असतानाही त्यांनी कधी पाठ फिरवली नाही. कार्यकर्त्यांना सोबत घेत, जनतेच्या अडचणी त्वरित सोडवण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळे नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल आदर वाढत गेला. त्यामुळेच प्रभागात "उमेश सरपाटील नगरसेवक व्हायलाच हवेत" अशी मागणी जोर धरत आहे.

या संवादात त्यांनी प्रभाग 33 साठीचे आपले विकासधोरण स्पष्ट केले. या भागातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी ठोस उपाय, क्रीडांगणे व उद्याने उभारणे, शासकीय व इतर जागांवरील अनधिकृत बांधकामांना नियमीत करण्याचे प्रयत्न, नागरिकांवरील अतिरिक्त भार कमी करण्यासाठी महापालिकेचा कर कमी करणे, स्वच्छतागृहे, बसथांबे व उत्तम शैक्षणिक सुविधा निर्माण करणे अशी अनेक कामे ते करणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच उत्तम आरोग्यसेवा, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र, धार्मिक संस्थांना बळ, मिळकत धारकांना प्रॉपर्टी कार्ड मिळवून देणे आणि शासकीय योजना प्रत्येक सामान्य नागरिकांपर्यंत पोहचवणे हेही त्यांचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

यावेळी उमेश सरपाटील भावुक होत म्हणाले, "मी सामान्य कार्यकर्ता आहे. पक्षाच्या संघर्षाच्या काळातही मी निष्ठेने काम केले. आता निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून मला संधी मिळावी, एवढीच माझी अपेक्षा आहे."

निवडून आलेले नगरसेवक आणि त्यांचे समर्थक अनेक वेळा नागरिकांसाठी अडचणी निर्माण करतात, त्यामुळे उमेदवारांची पार्श्वभूमी आणि कामकाज पाहून मतदान करावे, असे जनजागरण करताना त्यांनी सांगितले की— "मला नगरसेवक नव्हे, जनतेचा सेवक म्हणून काम करण्याची संधी द्यावी." प्रभागातील महिला, युवक, नागरिक आणि ज्येष्ठ त्यांच्याबद्दल आदराने बोलतात. शांत स्वभाव, प्रामाणिकता, लोकांशी जवळीक आणि कामाबद्दलची बांधिलकी—या सर्व गुणांमुळे "उमेश सरपाटील सारखाच नेता नगरसेवक व्हावा" अशी भावना सर्व स्तरातून व्यक्त होत आहे.

एकूणच पाहता, निष्ठा, प्रामाणिकता, संघर्षातून तयार झालेली ओळख आणि प्रभाग क्रमांक 33 साठी असलेली त्यांची मनापासूनची भावना यामुळे उमेश रघुनाथ सरपाटील हे प्रभागातील सर्वात लोकाभिमुख, विश्वासार्ह आणि मजबूत दावेदार म्हणून वेगाने पुढे येत आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे



### बालदिनानिमित्त शालेय वस्तूंचे वाटप; विद्यार्थ्यांमध्ये आनंदाची लहर

**पुणे (आरंभ पर्व) : बालदिनाचे औचित्य साधत प्रभाग क्रमांक 33 (खडकवासला शिवणे धायरी पार्ट) मध्ये भारतीय जनता पार्टीच्या वतीने अत्यंत सुंदर आणि हृदयस्पर्शी उपक्रम राबविण्यात आला. 14 नोव्हेंबर 2025 रोजी श्री. संतोष उर्फ दिवाकर शिवाजी मते, श्री. सचिन विष्णू दांगट आणि श्री. किशोर भाऊ पोकळे यांच्या माध्यमातून प्रभागातील सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात जवळपास ६,००० शालेय पॅडचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांची गुणवत्ता, आत्मविश्वास आणि शिस्त पाहून समाधान व्यक्त करण्यात आले. "विद्यार्थीदशेत मिळणारे संस्कार हे आयुष्याच्या पुढील महत्त्वाच्या प्रवासात दिशादर्शक ठरतात आणि हे संस्कार घडविण्याचे पवित्र कार्य आपले गुरुजन करतात," असे मत सर्व मान्यवरांनी यांनी व्यक्त केले. सर्व शाळांतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये असलेले गुरु-शिष्यांचे अतूट नाते आजच्या उपक्रमातून प्रकर्षाने जाणवले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा देत हा उपक्रम आनंदमय वातावरणात पार पडला. हा सर्व उपक्रम यशस्वी करण्यासाठी संबंधित कार्यकर्ते आणि शिक्षकांनी परिश्रम घेतले. बालदिनानिमित्त विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाची हास्यफुलं उमलवणारा हा उपक्रम प्रभागात विशेष कौतुकास्पद ठरला.**

# दुर्घटना पीडित कुटुंबीयांची डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतली सांत्वनपर भेट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



पुण्यातील नवलेपूल परिसर भीषण अपघातात मृत झालेल्या कुटुंबीयांची विधानपरिषद उपसभापती तथा शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. या भेटीत नवलकर आणि दाभाडे कुटुंबीयांशी संवाद साधताना एकाच कुटुंबातील चार सदस्यांचा मृत्यू झाल्याने कुटुंबावरील झालेला प्रचंड आघात आणि त्यांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा होता.दोन्ही कुटुंबातील सदस्य एकमेकांचे नातेवाईक असल्यामुळे ही घटना अत्यंत वेदनादायी असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. गोऱ्हे यांनी कुटुंबीयांशी बोलताना एक गंभीर आणि धक्कादायक बाब उघड केली. अपघातानंतर मदत करत असल्याचे भासवून काही लोकांनी मृतांच्या आधार कार्ड, मोबाईल फोन,दागिने तसेच महत्वाच्या कागदपत्रांची चोरी केल्याची माहिती पुढे आली आहे. याबाबत पोलीस आयुक्त यांना तातडीने तपास करणेबाबत कळविणार असल्याचे त्यांनी नमूद केले. या भेटीत त्यांनी स्थानिक अधिकाऱ्यांना देखील उपस्थित राहण्याचे सांगितले होते, जेणेकरून नुकसानभरपाई, पुनर्वसन आणि शासकीय मदतीबाबत तत्काळ माहिती व दिशा मिळू शकेल. तरीही मानसिक धक्का मोठा असल्याने अशा दुर्घटनातील आर्थिक मदतीतून दुःख भरून निघणे शक्य नाही.त्यामुळे अशा दुर्घटना टाळण्यासाठी उपाययोजना बाबत गंभीर होणे आता अत्यावश्यक झाले आहे असे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. गोऱ्हे यांनी यापूर्वीच केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री मा ना श्री नितीनजी गडकरी, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा ना श्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री मा ना श्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री मा ना श्री अजित पवार यांना निवेदनाद्वारे केंद्र,राज्य व स्थानिक प्रशासन यांच्या समन्वयातून उपाययोजना करण्यासाठी तातडीने पाऊले उचलण्याबाबत कळविले आहे.या निवेदनात त्यांनी नवले पुलावरील धोकादायक उतारात तातडीने बदल, पर्यायी वाहतुकीची सोय, कात्रज बोगद्यापासून न्यूट्रलवर उतरणाऱ्या वाहनचालकांसाठी विशेष जनजागृती, उतारावर वेग नियंत्रणाचे तांत्रिक उपाय तसेच जड वाहनांची तपासणी इत्यादी आवश्यक उपाययोजना करणेबाबत नमूद केले आहे.

याशिवाय या स्थळी वारंवार घडणाऱ्या अपघातांवर कायमस्वरूपी उपाय योजना सुचविणे व त्याच्या अंमलबजावणी कामी मुंबईत लवकरच बैठक घेणार असल्याचे सांगितले.

## तीन नगरसेवक असूनही कॉलनीची दुरवस्था कायम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



आंबील ओढा कॉलनी-सानेगुरुजी नगर येथील पुणे महापालिका कर्मचाऱ्यांच्या वसाहतीत आज सकाळी मीटर रूमला भीषण आग लागली. याआधीही याच कॉलनीमध्ये अशाच प्रकारच्या तीन दुर्घटना घडल्या असूनही मनपा प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई किंवा चौकशी झालेली नाही. कर्मचाऱ्यांच्या राहत्या घरांमध्ये वारंवार उद्भवणाऱ्या या दुर्घटनांकडे प्रशासनाने जणू पूर्ण पणे दुर्लक्ष केले असल्याचे आरोप होत आहेत. स्थानिक रहिवाशांच्या मते, आग विझविण्यात विलंब झाला आणि सुदैवाने मोठी जीवितहानी टळली. मात्र, ही घटना किती गंभीर असूनही मनपा अधिकाऱ्यांना याची माहितीच नसल्याचे समोर आले आहे. सदर मनपा वसाहतीत सत्ताधारी भाजपचे तीन नगरसेवक राहत असून, कॉलनीतील ढासळलेल्या इमारती, असुरक्षित विद्युतजाळे, आणि दुरुस्ती-अभावाची स्थिती पाहता प्रशासन व नगरसेवकांच्या कामकाजावर मोठे प्रश्नचिन्ह लागले आहे. रहिवाशांचे म्हणणे आहे की, वसाहतीतील समस्या वर्षानुवर्षे न सुटल्याने प्रशासन अक्षरशः 'हात टेकलेले' दिसते.

## छत्रपती शिवरायांच्या आदर्शांना उजाळा देणारे 'रायबा' महानाट्य संपन्न

### धायरी-शिवणे भागातील कलाकारांनी दाखवली चमक!


**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**



छत्रपती शिवाजी महाराजांच्या तेजस्वी इतिहासाला आणि त्यांच्या विचारांना नव्या पिढीपर्यंत पोहोचवणारे 'रायबा' हे महानाट्य शनिवारी गणेश गार्डन मंगल कार्यालय येथे अत्यंत भव्य आणि दिमाखदार पद्धतीने सादर करण्यात आले. दिग्दर्शक व लेखक प्रकाशजी वाघमारे यांच्या नेत्रदीपक दिग्दर्शनाखाली तब्बल ५० कलाकारांनी रंगमंचावर शिवकालीन झळाळी जिवंत केली. शिवरायांच्या काळातील मूल्यव्यवस्था आणि आजच्या युवकांच्या जीवनातील तफावत याचे प्रभावी दर्शन घडवणाऱ्या या दोन अंकी नाट्यप्रयोगाने सर्व प्रेक्षकांना विचार करायला लावले. कडाक्याच्या थंडीतही प्रेक्षक जागच्या जागी खिळून बसून संपूर्ण प्रयोगाचा आनंद घेत होते. विशेष म्हणजे, धायरी-शिवणे परिसरातील अनेक कलाकारांना या महानाट्यात भूमिका साकारण्याची संधी मिळाली, आणि त्यांनी आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली. यामध्ये धायरी-शिवणे मंडळाच्या भाजपा शिक्षण सेलच्या संयोजिका उमा राय रसाळ यांच्या दमदार आणि भावपूर्ण अभिनयाने विशेष लक्ष वेधले. त्यांच्या भूमिकेला प्रेक्षकांकडून मोठ्या टाळ्या मिळाल्या आणि त्यांनी रंगमंचावर आपले वेगळे स्थान निर्माण केले. या भव्य कार्यक्रमाचे आयोजन मंडळाध्यक्ष रुपेश घुले पाटील आणि भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव दत्ताभाऊ कोल्हे यांनी केले. कार्यक्रमाला भाजप सरचिटणीस धनश्रीताई कोल्हे, माजी सरपंच सुभाष नाणेकर, उमेश सरपाटील, अभिजीत धावडे, रोहिणीताई रहाणे, सुप्रिया करमरकर, महेश बजाज,राजेश नागपुरे यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून कलाकारांचे मनोबल वाढवले.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक राज शिनारे यांनी केले. या संपूर्ण उपक्रमाच्या यशासाठी भाजप सरचिटणीस हेमेंद्र जोशी यांनी घेतलेले परिश्रम आणि समन्वय विशेषत्वाने जाणवले.

'रायबा' हे केवळ महानाट्य नव्हते... ते शिवरायांच्या विचारांचे ज्वलंत स्मरण, संस्कारांची शिकवण आणि पिढ्यानपिढ्या टिकणाऱ्या प्रेरणेचा दीप होता.




# प्रभाग ३३ : विकासाचा नवा चेहरा अनिल भाऊ मते

### पक्षासाठी झटणारा सामान्य कार्यकर्ता नगरसेवकपदाची आस बाळगून प्रयत्न करतोय

**मिशन महानगरपालिका**
**प्रभाग क्रमांक ३३**



**(दै. आरंभ पर्व)**

धायरी-शिवणे प्रभाग क्रमांक ३३ मध्ये दीर्घकाळ सामाजिक कार्यातून जनतेशी जवळचा संबंध तयार करणारे आणि सक्रिय राजकारण २५ वर्षे निष्ठेने काम करणारे अनिलभाऊ मते यांनी आता नगरसेवक पदासाठी इच्छुक असल्याचे जाहीर केले आहे.

दैनिक आरंभपर्व पुणेने पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या दृष्टीने इच्छुक उमेदवारांशी मिशन महानगरपालिका हे वृत्त सदर सुरू केले आहे. त्यामध्ये त्यांनी संवाद साधला.

साध्या राहणीतून, शांत स्वभावातून आणि उच्च विचारसरणीतून स्वतःला घडवलेल्या अनिलभाऊंच्या व्यक्तिमत्वातील प्रामाणिकपणा आणि लोकांशी जोडलेली नाळ पाहता नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल आदर आणि विश्वास वाढत चालला आहे. अनेकांना वाटते की या साध्या, शांत कार्यकर्त्यामध्ये एक सशक्त नेता लपलेला आहे.

धायरी, शिवणे, नांदेड फाटा, रामनगर, गणेशनगर, पवारवाडी, साईनगर आणि समाविष्ट गावांमध्ये अनिलभाऊंचे जनसंपर्क अत्यंत मजबूत आहेत. त्यांनी राबवलेल्या विविध सामाजिक उपक्रम—आरोग्य शिबिरे, विद्यार्थ्यांना साहित्य वाटप, नागरिकांच्या तातडीच्या अडचणी सोडवणे, परिसरातील रस्ते व स्वच्छतेसाठी केलेले पाठपुरावे, युवक आणि महिलांसाठी निर्माण केलेल्या संधी—यामुळे ते प्रभाग ३३ मध्ये आश्वासक चेहरा बनले आहेत. लोकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर उपाय शोधण्याची त्यांची कार्यशैली नेहमीच कौतुकाची ठरली आहे.

पुणे शहर भाजप ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष रमेश गायकवाड, संतोषदादा मते, दत्ताभाऊ कोल्हे तसेच धायरी-शिवणे परिसरातील सर्व वरिष्ठ भाजप नेत्यांशी विश्वासाचे आणि घनिष्ठ संबंध आहेत. पक्षासाठी त्यांनी केलेले निष्ठेचे काम पाहता त्यांच्या दावेदारीला पक्षात सकारात्मकतेने पाहिले जात आहे.

समाविष्ट गावांचा आणि संपूर्ण प्रभाग क्रमांक ३३ चा विकास करणे हेच आपले ध्येय असल्याचे अनिलभाऊ सांगतात. धायरी-शिवणे परिसरातील रस्ते, पाणीपुरवठा, क्रीडांगणे, स्वच्छता, महिलांसाठी सुविधा, वाहतूक व्यवस्थापन आणि परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार भीमराव तापकीर यांच्या माध्यमातून ठोस प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. "भारतीय जनता पार्टी हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. निष्ठेने काम करणाऱ्याला पक्ष नक्कीच न्याय देतो," हा त्यांचा विश्वास त्यांच्या कामाचीच साक्ष देतो.

आजपर्यंत करत असलेल्या कामाची पक्ष निश्चितपणे नोंद घेऊन मला प्रभाग क्रमांक 33 च्या विकासासाठी उमेदवार देईल.

जनतेचा विकास हाच माझा जास्त असणार आहे. प्रामाणिकपणे जनतेची सेवा करण्याचा माझा संकल्प आहे. असे त्यांनी सांगितले.

धायरी-शिवणे प्रभागात अनिलभाऊ मते यांचे नाव गेल्या काही महिन्यांत विशेष चर्चेत आहे. प्रभाग क्रमांक 33 साठी धावणारा धडपडणारा कार्यकर्ता ही त्यांची ओळख आहे. त्यांच्या नावाला मिळणारा प्रतिसाद वाढत आहे. साधेपणा, कामाची प्रामाणिकता आणि विकासासाठीची स्पष्ट दृष्टी या गुणांमुळे प्रभाग क्रमांक ३३ मध्ये विकासाचा नवा चेहरा म्हणून अनिल भाऊ मते उदयास येत आहेत.

## नीलम गोऱ्हे व अण्णा बनसोडे यांच्या हस्ते दैनिक समर्थ गांवकरी दिवाळी अंकाचे प्रकाशन!



**पिंपरी चिंचवड (दै. आरंभ पर्व)**

पुणे-पिंपरी चिंचवड येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने आयोजित भव्य पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. पत्रकारिता, साहित्य, सामाजिक कार्य आणि लोकसंपर्क या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. या सोहळ्यात विधानसभा उपसभापती नीलम ताई गोऱ्हे व विधान परिषदेचे उपसभापती अण्णा बनसोडे यांच्या हस्ते दैनिक समर्थ गांवकरी दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले यावेळी त्यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी दिवाळी अंक, घड्याळ आणि शाल देऊन बहुमानपूर्वक सत्कार केला. कार्यक्रमात साहित्य, कला आणि पत्रकारितेतील दिग्गजही उपस्थित होते. ज्येष्ठ गझलकार भीमराव पांचाळे, पद्मश्री पुरस्कार विजेते प्रभू हरणे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत, तसेच संघाचे ब्रँड अँबेसिडर संजय फुलसुंदर या मान्यवरांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली.




दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



### प्रसिद्ध फ्रीस्टाइल फुटबॉलर जेमी नाइट पुन्हा पुण्यात

मुंबई (आरंभ पर्व) : पोदार आंतरराष्ट्रीय शाळांतील विद्यार्थ्यांनी जगप्रसिद्ध फ्रीस्टाइल फुटबॉलर जेमी नाइट यांचे पुन्हा स्वागत करताना उत्साह आणि आनंद व्यक्त केला. जेमी नाइट हे जगातील शीर्ष दहा फ्रीस्टाइल फुटबॉलपटूंमध्ये गणले जातात आणि अनेक वेळा गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे मानकरी ठरले आहेत. भारताच्या सहाव्या दौऱ्यावर, जेमी पुण्यातील 5 पोदार आंतरराष्ट्रीय शाळांमध्ये विशेष फ्रीस्टाइल फुटबॉल कार्यशाळा घेत आहेत. या कार्यशाळा पोदार एज्युकेशन नेटवर्कच्या क्रीडा उत्कृष्टता उपक्रमाचा महत्वपूर्ण भाग आहेत. या सत्रांचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना सर्जनशीलता, एकाग्रता आणि क्रीडाप्रेम यांच्या माध्यमातून प्रेरित करणे आहे. जेमी आपल्या अप्रतिम फुटबॉल नियंत्रणासाठी आणि आंतरराष्ट्रीय ब्रँड्ससोबतच्या सहकार्यासाठी जगभर ओळखले जातात. त्यांनी UEFA EURO 2020 साठी अधिकृत जागतिक शुभंकर म्हणून तसेच UEFA चॅम्पियन्स लीग फायनल्स 2017 आणि 2018 मध्ये सादरीकरण केले आहे. त्यांच्या गुरुत्वाकर्षणाला आव्हान देणाऱ्या ट्रिक्स आणि अचूक नियंत्रणाने विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.

### ‘केविनकेयर’च्या प्रमुख हेअर कलर ब्रँड इंडिकाचा पोर्टफोलिओ विस्तार




पुणे (आरंभ पर्व) : भारतात परवडणाऱ्या सुंदरतेला नवीन दिशा देण्यासाठी, इंडिका ईझी (Indica Easy), देशातील नंबर 1 शँपू हेअर कलर ब्रँड (स्रोत: NielsenIQ रिटेल मेजरमेंट रिपोर्ट, MAT सप्टेंबर 2025), ने दोन नवीन शेड्स – नॅचरल ब्राऊन आणि बर्गंडी, फक्त ₹10 मध्ये लॉन्च केले आहेत. या लॉन्चसह, केविनकेयर (CavinKare) ग्राहकांना इनोव्हेटिव्ह पर्सनल केअर सोल्यूशन्स देण्याची पारंपरिक प्रथा सुरू ठेवत आहे. नवीन ₹10 सॅशेजसह, इंडिका ईझी फक्त 10 मिनिटांत सॅलून-क्वालिटी हेअर कलर उपलब्ध करून देते, जे आजच्या गतिमान जीवनशैलीसाठी योग्य आहे. या प्रसंगी श्री रजत नंदा, बिझनेस हेड – पर्सनल केअर, केविनकेयर यांनी सांगितले: “केविनकेयरमध्ये, आम्ही नेहमी सुंदरता सर्वांसाठी सुलभ बनवण्यावर विश्वास ठेवला आहे. आमच्या नवीन ₹10 इंडिका ईझी शेड्सचा लॉन्च या दृष्टीकोनाचा भाग आहे, जो ग्राहकांना सहज समृद्ध आणि दीर्घकालीन रंगाचा अनुभव देतो.

### बालदिनानिमित्त मेडिकव्हर हॉस्पिटल, पुणे तर्फे भव्य चित्रकला स्पर्धा



पुणे (आरंभ पर्व) : बालदिनानिमित्त मेडिकव्हर हॉस्पिटल, पुणे यांनी सामाजिक बांधिलकी जपत मुलांसाठी एक रंगतदार व सृजनशील चित्रकला स्पर्धेचे भव्य आयोजन केले. या उपक्रमाला पुण्यातील विविध शाळांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. इंटेलिजंट कॅडेट सीबीएससी स्कूल (इंद्रायणी नगर), वैष्णव माता स्कूल (इंद्रायणी नगर), सेवन स्टार किड्स स्कूल या शाळांमधील ४०० हून अधिक विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धेत जोशपूर्ण सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला. स्पर्धेचे विषय विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देणारे मुलांच्या निरीक्षणशक्ती, कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलता उजागर व्हावी यासाठी स्पर्धेसाठी तीन रोचक विषय ठेवण्यात आले होते— मेडिकल ऑर्गन फेव्हरेट कार्टून अंडर द सी प्रत्येक विषयावर मुलांनी रंग, रेषा आणि कल्पनाशक्तीचा मनमुराद वापर करत आकर्षक चित्रे साकारली. विशेषतः "मेडिकल ऑर्गन" या विषयातून विद्यार्थ्यांनी मानवी शरीर रचनेविषयी उत्सुकता दाखवली, तर "अंडर द सी" आणि "फेव्हरेट कार्टून" या विषयांमधून त्यांच्या स्वतंत्र कलात्मक दृष्टिकोनाचे दर्शन घडले.

### अनैतिक संबंधातून महिलेचा गळा चिरून खून

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : शहराजवळील शिरोली येथील शिंदेवस्ती येथे अनैतिक संबंधातून विवाहित महिलेचा धारदार हत्याराने गळा चिरून निघृण खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. ही घटना गुरुवारी (दि. १३) रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडली असून, खेड पोलीस ठाण्यात या प्रकरणी खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खेड पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत महिलेचे नाव रूपाली विलास वाडेकर (वय ४६, मुळ रा. कल्याण, जि. ठाणे, सध्या रा. शिरोली, ता. खेड) असे आहे. संबधीत महिला मूळची ठाणे जिल्ह्यातील रहीवासी असून गेल्या काही दिवसांपासून ती शिरोली येथे प्रीयकराच्या घरी राहण्यास होती. संशयित आरोपी ललित दिपक खोल्लम (वय ३७, रा. शिंदेवस्ती, शिरोली, ता. खेड) याच्याशी रूपालीचे अनैतिक संबंध होते. दोघांमध्ये सतत भांडणे होत होती. त्याच रागातून ललितने रूपालीचा गळा चिरून खून केल्याचा प्राथमिक अंदाज आहे. शिरोली येथील एका इमारतीत दुसऱ्या मजल्यावरील सदनिकेमध्ये ही घटना घडली. रात्री उशिरापर्यंत दोघांमधील भांडणाचे आवाज आल्याचे शेजाऱ्यांनी सांगितले; मात्र नंतर साडेअकरा वाजता रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अवस्थेत महिलेचा मृतदेह आढळल्यानंतर एकच खळबळ उडाली. खेड पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार सुदर्शन सुखदेव माताडे यांनी याबाबत फिर्याद दिली असून, संशयीत ललित खोल्लम याच्याविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयीत आरोपी यापुर्वी काही वर्ष एका गुन्ह्यात तुरुंगात शिक्षा भोगत होता. त्यापुर्वी ठाण्यात असताना दोघांचे प्रेमसंबंध जुळले होते. महिलेच्या पतीचे निधन झाले असल्याने ती नातेवाईकांकडे शिरोली येथे ती राहायला होती, असे पोलिसांनी सांगितले. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण करीत आहेत, संशयीत आरोपी खोल्लम हा घटनेनंतर फरार असून पोलिस त्याचा कसून शोध घेत आहेत.

---

### वडगाव बुद्रूक – नवले पुल

# अपघातांची मालिका थांबणार तरी कधी?



**श्री. विठ्ठल तांबे**

(दै. आरंभ पर्व)

वडगाव बुद्रुक ते नवले पुल परिसर आता अक्षरशः मृत्यूचा पट्टा बनून गेला आहे. दिवसेंदिवस होणारे भीषण अपघात, वाढणारा मृतांचा आकडा आणि संबंधित यंत्रणांचे सततचे दुर्लक्ष-या सगळ्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण अधिकच घट्ट होत चाललं आहे. ‘आज घराबाहेर पडलेला माणूस संध्याकाळी सुखरूप घरी परतेल का?’ हा प्रश्न आता परिसरातील नागरिकांच्या मनात कायम जिवंत आहे.

महामार्ग प्राधिकरण (NHAI), पुणे महानगरपालिका (PMC), वाहतूक विभाग आणि स्थानिक लोकप्रतिनिधी-सर्वांची जबाबदारी स्पष्ट असतानाही प्रत्यक्षात मात्र वाहतूक नियोजनाचा बोजवारा उडालेला दिसतो. अपघातानंतर दौरे, बैठका, निवेदने, सोशल मीडियावरील "युद्धपातळीवर काम" अशा घोषणा-परंतु प्रत्यक्षात कामाचा वेग शून्य.

सत्ताधारी असोत वा विरोधक-सर्वांनीच या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्याचे चित्र नागरिक अनुभवत आहेत.

वारजे–सिंहगड रोड, कात्रज, धनकवडी, शिवगंगा, नऱ्हे, दत्तनगर, आंबेगाव या परिसरातून रोज हजारो नागरिक प्रवास करतात. पण भुमकर चौक – वडगाव बुद्रुक – नऱ्हे – आंबेगाव हा मार्ग आज अग्निदिव्य ठरलेला आहे. एका मागोमाग एक अपघात, ट्रक-कार- दुचाकींचे रगाडे आणि त्यात कोसळणारे जीव-ही आता दैनंदिन परिस्थिती झाली आहे.

पुढचा जीव जाण्यापूर्वी कुणीही प्रत्यक्ष आढावा घेण्यास पुढे येत नाही, हेच सर्वात भीषण वास्तव.

नागरिकांचा कळवळा – “हे मृत्यू थांबणार तरी कधी?”

घोषणांनी रस्ते सुरक्षित होत नाहीत, फोटोशूटने सेवा रस्ते पूर्ण होत नाहीत, जबाबदारी टाळून अपघात कमी होत नाहीत

नागरिकांचे म्हणणे एकच - सर्व एजन्सींनी एकाच टेबलावर बसून तातडीने उपाययोजना करायला हव्यात.

**शेवटचा, पण सर्वात महत्त्वाचा प्रश्न**

***निष्पाप नागरिकांचे जीव गेल्यावरच प्रशासनाला शहाणपण का सुचते? वडगाव बुद्रुक – नवले पुलावरील कालची दुर्घटना, काही दिवसांनी लोक विसरतील... आधीच्या असंख्य अपघातांसारखीच. परंतु गेलेले जीव... त्या कुटुंबांची वेदना... साक्ष देत राहतील की- या मृत्यूच्या पट्ट्यावर उपाययोजना होईपर्यंत सुरक्षिततेची हमी नाही.***

#### आवश्यक उपाय

- महामार्गालगतचे सेवा रस्ते युद्धपातळीवर पूर्ण करणे
- अतिक्रमणांचे निर्वंध उच्चाटन
- स्पीड नियंत्रण, बॅरिकेडिंग, सिग्नलसह वाहतूक नियमन
- PMC-NHAI-वाहतूक विभागामधील समन्वय
- बिल्डर–राजकीय हस्तक्षेपाला पूर्णविराम

#### मुख्य कारणांची जाणीव असूनही कृती नाही

१) अत्यंत तीव्र व धोकादायक उतार
नवीन कात्रज बोगदा – जांभुळवाडी – वडगावपर्यंत जाणारा उतार हा अपघातांचे प्रमुख कारण असल्याचे सर्वांना माहीत.

२) अतिक्रमणे व अरुंद सेवा रस्ते
महामार्गालगत बेकायदेशीर बांधकामे, व्यावसायिकांचे अडथळे, बिल्डर लॉबीचा प्रभाव-या सगळ्यामुळे रस्त्यांची रुंदी घटली आहे.

३) अर्धवट, वर्षानुवर्षे प्रलंबित सेवा रस्ते
नवले पुल, नऱ्हे, विद्यानगर, दत्तनगर या भागात सेवा रस्त्यांची दुरवस्था; अनेक ठिकाणी कामे अर्धवटच.

४) वाहतूक पोलीस मनुष्यबळाची कमतरता व वेगनियंत्रणाचा अभाव

५) PMC–NHAI जबाबदारी झटकण्याचा खेळ
एकमेकांवर जबाबदारी ढकलण्याच्या राजकारणात सार्वजनिक सुरक्षिततेचा बळी घेतला जात आहे.
अपघातानंतरचा नेहमीचा नाट्यमय क्रम
वरिष्ठ अधिकारी व लोकप्रतिनिधींचे दौरे
तातडीच्या बैठका | निवेदनांचे फोटोशूट | सोशल मीडियावर घोषणा | परंतु – सुधारणा शून्य.

---

### गर्भधारणापूर्व आरोग्य व सुरक्षित मातृत्वाचा संदेश



पुणे (दै. आरंभ पर्व)

द फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक अॅन्ड गायनेकोलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया (फॉग्सी) आणि पुणे ऑब्स्टेट्रिक अॅन्ड गायनेकोलॉजिकल सोसायटी (पीओजीएस) यांच्या सहयोगाने संपूर्णा पब्लिक फोरम उपक्रमा अंतर्गत गर्भधारणापूर्व आरोग्याविषयी जनजागृती करणारा विशेष कार्यक्रम गुरूवारी,आयएमए हॉल, टिळक रोड येथे पार पडला. गर्भधारणेपूर्वीच्या आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि निरोगी गर्भधारणा व सुरक्षित मातृत्वाला प्रोत्साहन देणे हा या समाजाभिमुख उपक्रमाचा उद्देश होता. या कार्यक्रमाचे नेतृत्व फॉग्सीच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.सुनिता तांदुळवाडकर यांनी केले. प्रसिध्द अभिनेत्री मृण्मयी देशपांडे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.याप्रसंगी पीओजीएसचे अध्यक्ष डॉ.मनिष माचवे, फॉग्सीच्या राष्ट्रीय सह सचिव डॉ.अश्विनी काळे,पीओजीएसचे सचिव डॉ.निलेश बलकवडे,डॉ पूजा लोढा (आयोजक सचिव), कार्यक्रमाचे संयोजक डॉ.वैजयंती पटवर्धन, डॉ.रेवती राणे तसेच समन्वयक डॉ.आरती निमकर,डॉ अलका क्षीरसागर, डॉ.अलका कुथे आदी मान्यवर उपस्थित होते.

### ‘भाजपाजवळ ‘मोदीजी’रुपी ऑक्सिजन’ : रविंद्र चव्हाण



मुंबई (दै. आरंभ पर्व)

‘आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी हे प्राणवायूसारखे आहेत. त्यामुळे भाजपाजवळ २४ X ७ ऑक्सिजन आहे. कोणी कितीही हायड्रोजन बॉम्ब आणले, तरीही विजय ऑक्सिजनचाच होतो.’, असे प्रतिपादन भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी काल शुक्रवारी (१४ नोव्हेंबर) रोजी केले.

शुक्रवार (१४ नोव्हेंबर) रोजी बिहार विधानसभा निवडणुकीच्या लागलेल्या निकालात सत्तारुढ राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं दणदणीत यश मिळवलं. त्यानंतर भाजपाकडून मुंबईत विजयोत्सव साजरा करण्यात आला होता. यावेळी रविंद्र चव्हाण यांनी गमछा घालून भाजपप्रणित एनडीएचा विजय साजरा केला. तसेच कार्यकर्त्यांना संबोधित केले. यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी पालिका निवडणुकांचे रणशिंग फुंकले. ते म्हणाले, ‘बिहारच्या विधानसभा निवडणुकीत जनतेनं काँग्रेस आणि मित्रपक्षांना त्यांची जागा दाखवून दिली. आता महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपण सर्वांनी मिळून त्यांना पुन्हा एकदा त्यांची जागा दाखवून द्यायची आहे.’, असा कानमंत्र त्यांनी कार्यकर्त्यांना दिला.

बिहारमध्ये भारतीय जनता पक्षाने १०१ जागांवर निवडणूक लढवली होती. त्यापैकी तब्बल ८९ जागांवर भाजपाचे उमेदवार विजयी झाल्याने भाजपाच्या ९० टक्के स्ट्राईक रेटची राजकीय वर्तुळात तसेच सोशल मीडियावर जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे. भारताच्या राजकीय पटलावरील एक महत्त्वाचे व मोठे राज्य म्हणजे बिहार. बिहारमधील राजकीय समीकरणांचा राष्ट्रीय राजकारणावर मोठा परिणाम पाहायला मिळतो.

बिहारमधील एनडीएच्या विजयाने विरोधकांना बॅकफुटवर ढकलले आहे. त्यामुळे राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या एकतर्फी अर्थात महायुतीच्या बाजुने होण्याची दाट शक्यता राजकीय जाणकारांनी वर्तवली आहे.

---

### वाफगाव येथे ‘समृद्ध किसान प्रकल्प’योजनेचा शुभारंभ

#### शेतकऱ्यांना स्प्रिंकलर व सेंद्रिय खत वाटप



राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)

वाफगाव (ता. खेड) येथे ‘समृद्ध किसान प्रकल्प’ योजनेचा शुभारंभ करण्यात आला आहे. हा प्रकल्प ब्लू डार्ट कंपनीच्या सामाजिक दायित्व निधीतून राबविण्यात येत असून बायफ या संस्थेद्वारे अंमलात आणला जात आहे. या प्रकल्पामुळे या परिसरातील शेतकऱ्यांना शेतीसाठी फायदा होणार आहे. खेड तालुक्याच्या पूर्व भाग हा अवर्षणप्रवण भाग आहे. उन्हाळ्यात येथे शेती व पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण होते. बायफसंस्था यांच्या वतीने या भागात मोठ्या प्रमाणात जलसंधारणाची कामे झाली आहेत. या परिसरातील गोसासी, वरुडे ,जऊळके, वाफगाव या भागात काही वर्षापासून संस्था कार्यरत असून जलसंधारण, शेती विकास, पशुधन संवर्धन, महिला सक्षमीकरण आणि सौरऊर्जा या क्षेत्रांत त्यांची कामे झाली आहेत. वाफगाव येथे संस्थेच्या माध्यमातून ‘समृद्ध किसान प्रकल्प’ अंतर्गत जलसंधारण, कृषी सुधारणा आणि महिला सक्षमीकरण या प्रमुख घटकांवर विशेष भर देण्यात येणार आहे. संस्थेच्या वतीने शेतकऱ्यांना सौर कीटक सापळे, सूक्ष्म सिंचनासाठी ड्रीप, स्प्रिंकलर, गांडूळ खत बेड, सेंद्रिय खते व विविध योजना प्रथम टप्प्यात राबविण्यात येणार असल्याचे संस्थेचे सुधीर लोखंडे व अतुल बोऱ्हाडे यांनी सांगितले. यामुळे शेतकऱ्यांचा विकास होणार आहेत.

या प्रकल्पासाठी गावामध्ये ग्राम विकास समिती स्थापन करण्यात आली असून याद्वारे शेतकऱ्यांची विविध योजनेसाठी निवड होणार आहे. ग्रामस्थांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून गावकऱ्यांचा प्रकल्पाबाबतचा दृष्टिकोन अत्यंत सकारात्मक आहे या माध्यमातून वाफगाव गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे.

### बिबट्याच्या हल्यात शेतकरी जखमी



राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)

खेड तालुक्यातील रेटवडी येथे शेतातील कृषिपंप चालू करण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यावर बिबट्याने मागून झडप टाकली. या वेळी प्रतिकार करत शेतकऱ्याने स्वतःचा बचाव करत तेथून पळ काढला. ही घटना सोमवारी (दि. १०) सकाळी घडली. नीलेश किसन पवार (वय ३३, रा. रेटवडी, ता. खेड) असे बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. रेटवडी परिसरात दिवसेंदिवस बिबट्याचे शेतकऱ्यांवर हल्ले सुरू आहेत. काही दिवसांपूर्वी याच परिसरात एका लहान मुलावरही बिबट्याने हल्ला केला होता. सोमवारी सकाळी नीलेश पवार कृषिपंप सुरू करण्यासाठी शेतात चालले होते. त्यावेळी अचानक बिबट्याने पाठीमागून पवार यांच्यावर झडप घातली. व मान तोंडात पकडण्याचा प्रयत्न केला. पवार यांनी आरडाओरड करून बिबट्याचा प्रतिकार केला. बिबट्याच्या तावडीतून स्वतःची सुटका करून घेतली आणि तेथून पळ काढला. पवार यांच्या हाताच्या दंडावर बिबट्याने नखे ओरखडून त्यांना जखमी केले आहे.

---

# सोलापूरमध्ये आजवर ३२०५ जोडप्यांचे जीवनबंधन



सोलापूर (दै. आरंभ पर्व)

लोकमंगल फाउंडेशनतर्फे सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याला यंदा २० वर्षे पूर्ण झाली. २००६ मध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाने आजवर सलग ४६ भव्य विवाह सोहळे आयोजित केले असून, एकूण ३२०५ जोडप्यांचे विवाह सामूहिक पद्धतीने संपन्न केले आहेत. समाजातील दुर्बल व सर्वधर्मीय कुटुंबांना आधार देणारा हा उपक्रम महाराष्ट्रातील सर्वात मोठा आणि सातत्याने राबवला जाणारा सामुदायिक विवाह सोहळा ठरला आहे. या सर्व सामाजिक कामगिरीचे मूळ व्यक्तिमत्त्व म्हणजे माजी सहकार मंत्री व आमदार सुभाष देशमुख. गेल्या दोन दशकांपासून त्यांनी सामुदायिक विवाह सोहळ्याद्वारे समाजातील अनाठायी विवाह खर्चाला आळा घालणे, सर्वधर्म समभाव वाढवणे आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबांना उभारी देणे हे उद्दिष्ट साध्य केले आहे. मागील २० वर्षांत विवाहबद्ध झालेल्या ३२०५ जोडप्यांमध्ये हिंदू 2492, बौद्ध 681, मुस्लिम 21, ख्रिश्चन 04 आणि जैन 07 अशी विविध धर्मीय जोडपी सामील आहेत. यामुळे लोकमंगलचा सोहळा हा प्रत्यक्षात सामाजिक सलोखा व एकतेचा संदेश देणारा उपक्रम ठरतो. यंदाचा सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा विजापूर रोडवरील शिवाजी अध्यापक विद्यालय (D.Ed.) मैदानावर संपन्न झाला. संपूर्ण मैदानात आकर्षक सजावट, सुव्यवस्थित व्यवस्थापन आणि ढोल-ताशांच्या गजरात वातावरण उत्सवमय झाले. या भव्य सोहळ्यात ५२ जोडप्यांनी रेशीमगाठ बांधून वैवाहिक जीवनाची नवी सुरुवात केली.

आमदार सुभाष देशमुख आणि सौ. स्मिता देशमुख यांच्या हस्ते यंदाही कन्यादान पार पडले. एकूण ४९ हिंदू आणि ३ बौद्ध विवाह संपन्न झाले. सोहळ्यात मोठ्या संख्येने नातेवाईक, नागरिक आणि मान्यवर उपस्थित होते.

आ. देशमुख यांनी सांगितले की, “समाजातील वधू–वरांना आर्थिक व मानसिक आधार देणे, विवाहातील अनाठायी खर्चाला आळा घालणे आणि दक्षिण तालुक्यातील प्रत्येक गावात सामुदायिक विवाह सोहळा राबवणे हा आमचा संकल्प आहे.”

सकाळी सर्व वधू-वरांसाठी समुपदेशन आयोजित करण्यात आले. वैवाहिक जीवनातील समजूतदारपणा, आर्थिक नियोजन, आरोग्यविषयक मार्गदर्शन अशा विविध विषयांवर विशेष चर्चा झाली. त्यानंतर वधूंना शालू, वरांना सपारी आणि रुखवत साहित्याचे वितरण करण्यात आले.

सोहळा स्थळी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. पाहुण्यांसाठी चपाती, भाजी आणि बुंदीचा लाडू असे भोजन देण्यात आले. तसेच खुल्या बग्गीतून काढलेली वधू-वरांची मिरवणूक हा सोहळ्याचा विशेष आकर्षण ठरली. सनई-चौघड्याच्या निनादात ही मिरवणूक सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.

यंदाच्या सोहळ्याला ‘जिल्हा पर्यटन थीम’ची विशेष झळाळी मिळाली. जिल्ह्यातील ऐतिहासिक ठिकाणे, सांस्कृतिक वारसा, परंपरा आणि पर्यटन स्थळांची माहिती देणारे पॅनेल्स आणि स्टॉल्स मैदानात उभारण्यात आले होते. अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराजांची मूर्ती विशेष आकर्षण ठरली. “भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे” या संदेशाने उपस्थितांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

या सोहळ्याला धार्मिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून नवदांपत्यांना आशीर्वाद दिला. पंढरपूर मंदिर समितीचे अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, आमदार विजयकुमार देशमुख, मठांचे मान्यवर महाराज मंडळी तसेच रोहिणी तडवळकर, राम जाधव आदींची उपस्थिती विशेष ठरली. सर्व मान्यवरांचा लोकमंगल फाउंडेशनचे अध्यक्ष रोहन देशमुख यांनी सत्कार केला.